
# माणूस

२६ जुलै १९६९

किंमत : ४० पैसे



२६ जुलै १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष नववे : अंक : आठवा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

किमत : ४० पैसे वार्षिक वर्गणी : वीस रुपये परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

१२ जुलै १९६९ चा अंक वाचला. 'माणूस' च्या मुखपृष्ठावरील संगम प्रेसच्या शुभेच्छाही वाचल्या. मात्र हा 'माणूस' मुंबईला पुरेसा यावा. अशी मोठी अपेक्षा आहे.

मी वृत्तपत्र विक्रेता असून 'माणूस' मला बऱ्याच वेळा मिळत नाही. कित्येक वेळा तर शोधून सापडत नाही. माझे वाचक त्यासाठी 'माणूस' वर नाराज होतात. कृपया प्रतींचा पुरवठा थोडा जास्त प्रमाणावर करावा.

१४ जुलै ल. ना. तावडे, मुंबई

[ 'माणूस' चे मुंबईतील विक्रेते श्रीमान बागवे आपली अडचण दूर करतील असा विश्वास वाटतो. – संपादक ]

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

४ जुथिका, स्लेटर रोड
मुंबई ७.

७ जुलै, १९६९

## संपादक 'माणूस' यांस
## स. न. वि. वि.

'माणूस' च्या ५ जुलैच्या अंकात 'मुक्ताफळे' या सदरात 'थोर सोसायटीचा अध्यक्ष' या मथळ्याखाली आपण प्रा. अ. भि. शहा यांच्याविषयी काही मजकूर प्रसिद्ध केला आहे. सदरहू 'थोर सोसायटी 'चा ऊर्फ 'इंडियन सेक्युलर सोसायटी'चा मी एक सभासद असल्यामुळे आपल्या स्तंभलेखकाविषयी काळजी वाटून मी हे पत्र लिहीत आहे.

गोध्रा येथे जे वैष्णव मंदिर बांधण्याविषयी तेथील नगरपालिकेने सक्रिय आस्था दाखवलेली आहे, तशी आणखी शेकडो मंदिरे कोठेही बांधली गेली तरी आमची 'थोर सोसायटी' त्याला विरोध करणार नाही. प्रा. शहांचे म्हणणे कडव्या हिंदु-धर्मप्रचारकांखेरीज कोणाच्याही लक्षात येईल, इतके सोपे आणि मुद्देसूद आहे. नगरपालिका सर्व धर्मांच्या, तसेच नास्तिक लोकांकडूनही कर वसूल करीत असतात. त्यांची कामे शहर स्वच्छ ठेवणे, तेथील सार्वजनिक सुखसोयींची व्यवस्था पाहणे, जनतेच्या आरोग्याकडे लक्ष पुरवणे, वगैरे असतात, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. धर्म-निरपेक्ष दृष्टीने करावयाची ही ऐहिक जीवनाशी संबंध असलेली कामे आहेत. अशा परिस्थितीत एखाद्या नगरपालिकेने भर रस्त्यात मंदिर उभारण्यासाठी उत्साहाने खटाटोप केला तर हे पारलौकिक स्वरूपाचे नगरपालन होईल व त्यात रस्ता नावाच्या ऐहिक सोयीचे निदान वळण तरी बदलावे लागेल, हे उघड आहे. त्यातून गोध्रा शहरातल्या जातीय तेढीचा इतिहास आपल्या स्तंभलेखकाला ठाऊक असता तर या परलोकनिष्ठ कृत्यामुळे जातीय असंतोष वाढणे सहजशक्य आहे, ही प्रा. शहांची धोक्याची सूचना त्याच्या सहज ध्यानात आली असती. धर्मनिष्ठ पत्रकारी एकूण धोक्याचीच !

धार्मिक अभ्यासाला—म्हणजे फक्त वेदपठणाच्या अभ्यासाला—महाराष्ट्र सरकार जे प्रोत्साहन देऊ पाहत आहे त्यावरील प्रा. शहांची टीकासुद्धा आपल्या स्तंभ-लेखकाच्या डोक्यावरून गेलेली दिसते. जर धर्माच्या नावावर बहुपत्नित्व व बहु-प्रसवाचा पुरस्कार करणाऱ्या धर्मांना सरकारने प्रोत्साहन देऊ नये, असे आपल्या स्तंभलेखकाला खरोखरच वाटत असेल तर धर्माच्या नावावर या गोष्टींखेरीज शिवाय अस्पृश्यता इत्यादी आणखीही भयंकर गोष्टींचा पुरस्कार करणाऱ्या धर्मा-

विषयी तरी त्याला कळवळ का वाटावी ? प्रा. शहांचा अभ्यासाला विरोध नाही, फक्त अभ्यास सर्वंकष असावा, असे ते सुचवतात,

आपला

**दिलीप पुरुषोत्तम चित्रे मुंबई**

## संपादक ' माणूस ' यांस

जुलै ११

**स. न. वि. वि.**

श्री. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचे पत्र वाचले त्यात माझ्या लेखनावर काही सरळ बुद्धीची वैचारिक टीका आहे व काही निर्बुद्ध शेरे आहेत. प्रथम. टीकेसंबंधी माझे म्हणणे सांगतो.

ज्यांची वकिली श्री. चित्रे यांनी केलेली आहे-त्या प्रा. अ. भि. शहा यांचे गोध्रा येथे बांधल्या जाणाऱ्या वैष्णव मंदिरासंबंधात मूळ तीन आक्षेप असे आहेत–

१. हे मंदिर रस्तारुंदी होईल, तेव्हा भर रस्त्यात मध्ये येणारे आहे.


२. हे मंदिर मुसलमान वस्तीत असल्याने जातीय तेढ वाढेल.

३. नगरपालिकेने अशा रीतीने एकाच धर्माच्या मंदिराला उत्साहाने मदत करावी, हे घटनाविरोधी व निधर्मी राष्ट्रवादाच्या विरुद्ध आहे.

पहिल्या मुद्यासंबंधी सांगायचे तर भर रस्त्यात कुठल्याही धर्माचे मंदिर वा प्रार्थना मंदिर असता कामा नये. आज रस्त्याच्या मध्ये असलेली मंदिरे, मशिदी आणि पीर हे कुणाच्या रागालोभाची व धमक्यांची पर्वा न करता रस्त्यातून हलवलीच पाहिजेत. मुंबई-पुणे येथील रस्त्यांवर ऐहिक रहदारीला अडथळा करणारी पिरांची थडगी आणि मशिदी आहेत त्यांचा निर्देश मी माझ्या लेखनात केलेला आहे. मुंबई-पुण्याच्या नगरपालिका अधिक सुबुद्ध आहेत, असे असूनही प्रा. शहा यांची ' इंडियन सेक्युलर सोसायटी ' या बाबतीत काहीही करणार नाही, असे माझे विधान आहे. माझे हे विधान खोटे असल्याचा पुरावा थोर अध्यक्षांनी दिला, तर माझ्या विधानाबद्दल माफी मागताना मला अतिशय आनंद होईल.

मात्र एखादे मंदिर हे केवळ मुसलमान वस्तीत आहे म्हणून तेढ वाढणार असेल, तर हे दंगलीचे आव्हान पोलिसखात्याने व सरकारने स्वीकारून भारतातील कुठल्याही मोकळ्या भूभागावर मंदिर बांधण्याचा हक्क प्रस्थापित केलाच पाहिजे. दंगलीच्या भीतिखेरीज अन्य काही ऐहिक अडचणी असतील तर त्यांचा फक्त शासन विचार करील. शासन हे ' भक्तां'चे असावे, असा आग्रह नाही, पण ते ' भ्यांडांचे ' मात्र नसावे !

[ पृष्ठ ५२ वर ]



# दिल्ली

## दिनांक १४ जुलै

एखाद्या देमार फिलमचा सनसनाटी सप्ताह धूमधडाक्यात सुरू व्हावा अशी परिस्थिती दिल्लीच्या राजकारणात गेल्या आठ-दहा दिवसांत झाली आहे. राजधानीच्या राजनैतिक रंगमंचावर नुकत्याच घडलेल्या तीन अंकी थ्रिलरच्या पहिल्या अंकात प्रधानमंत्री इंदिराजींनी बंगलोरच्या काचगृहात प्रवेश करायच्या आधीच त्याच्यावर एक धोंडा टाकला. तो म्हणजे 'घाईघाईने टिपलेले काही उडते विचार' दिल्लीहूनच काँग्रेस कार्यकारिणीला ऐनवेळी पाठवून काँग्रेसच्या आर्थिक धोरणाला आपल्या मनासारखी कलाटणी देण्याचा खळबळजनक प्रयत्न केला. दुसऱ्या अंकात बाईंच्या नाकावर टिच्चून सिंडिकेटने राष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून लोकसभापती संजीव रेड्डी यांची निवड केली व किंगपेक्षा किंगमेकर वरचढ असतो हे दाखवून दिले; अन् तिसऱ्या अंकात हंगामी राष्ट्रपती गिरी यांनी पक्षपरमेश्वरापुढे नतमस्तक न होता रेड्डींच्या नावाची घोषणा झाल्यावर काही तासांतच "आपण स्वतंत्र उमेदवार म्हणून अध्यक्षीय निवडणूक लढवणार" असे जाहीर करून अंतर्गत बाचाबाचीत दंग झालेल्या काँग्रेसश्रेष्ठींना चांगलाच हादरा दिला. या तिन्ही घटनांचे अंतःप्रवाह तपासले तर बुडाशी बराच राजकीय गाळ पसरलेला आढळतो.

### अथातो अनर्थ जिज्ञासा

प्रथम म्हणजे बाईंनी गेल्या साडेतीन वर्षांच्या आपल्या कारकीर्दीत कुठल्याही गोष्टीबद्दल राष्ट्रीय धोरण आखताना पाहता पाहता पवित्रा बदलण्याचा जादु-ई-खेळ बऱ्याच वेळा करून दाखविला असला तरी बंगलोरला उडत पाठविलेले उडते विचार म्हणजे कळस आहे यात विवाद नाही. या राजवटीतल्या दोन ठळक आर्थिक घटनांपैकी पहिली घटना म्हणजे रुपयाचे अवमूलन. हे परदेशी जबरदस्तीमुळे करावे लागले हे नाकबूल करण्यात अर्थ नाही – अन् दुसरी म्हणजे योजनेला दिलेली सुटी. भारताचे अर्थकारण वास्तविक पाहता अनर्थकारण आहे असे या दोन घटना सिद्ध करीत असताना मूठभर बँकांचे राष्ट्रीयीकरण करून किंवा त्यांना सरकारी

उद्योगधंद्यात वर्षाकाठी दोनशे कोटी रुपये गुंतवायला भाग पाडून ‘ जिकडे तिकडे चोहीकडे, आर्थिक आनंदी आनंद गडे ’ होईल, अशी भोळीभाबडी समजूत बाईंच्या इन्स्टंट विचारमंथनामागे असेल, असे वाटत नाही.

मग या उडत्या विचारांच्या खलित्याचा ‘ आंतरः कोपि हेतु ’ कोणता ? या प्रश्नाचे उत्तर ‘ देवो न जानाति कुतो मनुष्यः ’ या वर्गातले असले तरी दोन अंदाज बांधता येतील. त्यांतला पहिला म्हणजे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या गटबाजीत एकमेकांचे पाय ओढण्याचा सर्वांच्या आवडीचा खेळ नेहमीच चाललेला असतो, त्यातलाच हा शहाला काटशह असू शकेल. दुसरे म्हणजे येन केन प्रकारेण ‘ प्रागतिक ’ दिसण्याचा बाईंचा हट्ट ! अध्यक्षीय निवडणुकीचे वेध लागले असताना हा प्रागतिक पवित्रा उपयोगी पडेल, असा इंदिराजींचा होरा असावा.

अर्थात् बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी म्हणजे मोरारजींच्या ‘ सामाजिक नियंत्रणा ’च्या तत्त्वावर उघड उघड हल्ला होता व मोरारजींसारखा खमक्या माणूस त्याला सहजासहजी बळी पडेल हे सुतराम् अशक्य होते. अखेर यशवंतरावांनी ‘ रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति ’ असा केळकरी पर्याय काढून “ राष्ट्रीयीकरणाशिवाय सामाजिक नियंत्रण म्हणजे फसवेगिरी आहे, तर सामाजिक नियंत्रणाशिवाय राष्ट्रीयीकरण निरर्थक आहे ’ अशी मखलाशी केली. असे म्हणतात की, यशवंतरावांनी मांडलेल्या समेटाच्या प्रस्तावात ‘ राष्ट्रीयीकरण ’ हा शब्दप्रयोग करायला मोरारजींची संमती मिळावी म्हणून बरेच प्रयत्न झाले, पण तो माणूस बधला नाही. त्यामुळे बँकांवरील सामाजिक नियंत्रण अधिक कडक करावे एवढ्या आशीर्वादावर इंदिराजींची बोळवण झाली.

## अंताचा आरंभ

राष्ट्रपतिपदासाठी काँग्रेसचा अधिकृत उमेदवार म्हणून संजीव रेड्डींची निवड म्हणजे बाईंच्या हुकमतीच्या अंताचा आरंभ आहे असे म्हणायला हरकत नाही. रेड्डींची निवड जाहीर झाल्यानंतर तासाभराच्या आत पत्रकारांना दिलेल्या मुलाखतीत निवड करताना वापरलेल्या पद्धतीने आपल्याला ‘ निश्चितच फार वाईट ’ वाटले असे इंदिराजींनी सांगून टाकले. त्याचबरोबर आपल्याला विरोध करणारी ही मंडळी कोण आहेत हे जवळ जवळ स्पष्टपणे सुचवून आपण त्यांच्याशी लढा चालू ठेवणार आहोत, अशीही त्यांनी रणगर्जना केली. राष्ट्रपतींचे पद पक्षातीत असावे म्हणून आपण मतैक्याचा प्रयत्न केला तेव्हा गिरी व जगजीवनराम यांची नावे पुढे आली होती, असा त्यांचा दावा आहे.

मग चव्हाणांनी तुमच्या उमेदवाराला विरोध कसा केला असा सरळ सवाल पत्रकारांनी बाईंना केला, पण त्यांनी त्याचे उत्तर देण्याचे टाळले. चव्हाणांच्या मतामुळेच ऐन वेळी रेड्डींचे पारडे जड झाल्याने इंदिराजींच्या गोटात हल्ली

चव्हाणांची चर्चा जोरात चालते व त्यांनी ऐन वेळी 'दगा' दिला असा आरोप केला जात आहे. उलट, संसदीय समितीच्या काही ज्येष्ठ सभासदांनी या आरोपाचा इन्कार केला आहे; पण मोरारजी–चव्हाण द्वयीवर इंदिराजींनी जी प्रच्छन्न टीका केली तिच्यामुळे मंत्रिमंडळात आता खांदेपालट होणार की काय याबद्दल राजधानीत वावड्या उडू लागल्या आहेत. विशेषत:, इंदिराबाई व मोरारजी यांचा बेबनाव मिटविण्यासाठी आरोग्यमंत्री शहा यांनी मध्यस्थी आरंभली आहे. बंगलोरहून दिल्लीला परतल्यावर बाई दिवसभर ऑफिसातच गेल्या नाहीत, त्यामुळे तर सिंडिकेटवरचा आपला घुस्सा प्रकट करण्यासाठी त्या काही तरी अवचट करून बसणार आहेत की काय, अशी शंका पसरली; पण तसे काही होणार नाही, बाई केवळ विश्रांती घेत आहेत, असा त्यांच्या अंतेवासियांनी दिलासा दिला. मात्र विश्रांतीच्या निमित्ताने घरी राहिलेल्या बाईंना भेटण्यासाठी गोटातल्या मंडळींची दिवसभर रीघ लागली होती !

## अहो आश्चर्यम् !

हा सर्व गोंधळ कमी होता म्हणूनच की काय हंगामी राष्ट्रपती गिरी यांनी 'मी उभा आहे' अशी सनसनाटी घोषणा केली. त्यांनी काढलेल्या जाहीर पत्रकात दोन मुख्य मुद्दे मांडले आहेत.. त्यांतला पहिला म्हणजे पक्ष-श्रेष्ठींनी आपले नाव अव्हेरले असले तरी राष्ट्रपतिपदासाठी आवश्यक असणारी योग्यता आपल्या अंगी अगदीच नाही असे नाही, याचा विचार व्हायला हवा होता. दुसरे म्हणजे वार्धक्याकडे बोट दाखविले जाते, पण उपराष्ट्रपतिपदासाठी दोनच वर्षांपूर्वी पक्षाने आपली निवड केली तेव्हा ती पाच वर्षांसाठी केली होती, तेव्हा आपली वृद्धावस्था हे कारण नसून ही सबब आहे.

आता यक्षप्रश्न असा की गिरींचा हा निर्णय स्वत:चाच आहे की नाही ? त्यांनी हा निर्णय इंदिराजींना – निदान त्यांच्या गोटातल्या मंडळींना – विचारून तर घेतला नाही ना, अशी शंका अनेकांना येत आहे. इंदिराजींनी असे काही नसल्याचा निर्वाळा दिला आहे; तरीही काही मंडळींची शंका फिटलेली नाही. उलट रेड्डी प्रकरणी इंदिराजींना प्रकटपणे, उत्कटपणे वाटणारी पराभवाची खंत आणि गिरींची उमेदवारी यांची सांगड घालू पाहणाऱ्या मंडळींना हे लागेबांधे दिसणे अपरिहार्य आहे. गिरींनी आपली उमेदवारी मागे घ्यावी, असे प्रयत्न आता चालू झाले असले तरी त्यांनी टाकलेल्या या बाँबगोळ्यामुळे काँग्रेसी गोटात अधिकच सावळा गोंधळ माजणार हे उघड आहे.

– अनामिक



# मुक्ताफळे

## चंद्र नर्भीचा मळला

कोलंबस डिस्कव्हर्ड अमेरिका ! हे वाक्य आम्ही जेव्हा प्रथम ऐकले, तेव्हा आमच्या मनात कोलंबसाविषयी काडीचाही आदर निर्माण झाला नाही. अमेरिका शोधून काढून, कोलंबसाने आमचे काय मोठे भले केले असे आम्हांला त्या वेळी वाटले. कारण त्या वेळी आम्ही अँग्लो-व्हर्नाक्युलर स्कूल अशा भयंकर नावाच्या एका इंग्रजी शाळेत नुकतेच गेलेलो होतो. मास्तरांच्या दृष्टीनेही या वाक्यात कोलंबसाला अथवा अमेरिकेला मुळीच महत्त्व नव्हते ! ‘ शोध लावणे ’ आणि ‘ शोधून काढणे ’ यांतील फ़रक त्यांना सांगायचा होता. आपली वृत्तपत्रीय माय मराठी असे सूक्ष्म विच्छेदन करीत नाही. ‘ शोध लावणाऱ्यास शंभर रुपये इनाम ’ अशा मथळ्याखाली “ म्हैस हरवली आहे, कपाळावर पांढरा चांदवा. अंगाने भरलेली. ‘ दुधवाला ’ अशी हळी मारल्यास थांबते ” असे म्हशीचे साग्रसंगीत वर्णन असते ! यामुळे आम्हा बहुसंख्य व्हर्नाक्युलर मुलांना, अँग्लो मास्तर इतक्या तावातावाने काय समजावीत आहेत हेच कळले नाही.

हळू हळू रेशनिंगचे धान्य खाऊनही आम्ही वयाने मोठे झालो. स्वातंत्र्य मिळाले. धान्य काळ्या बाजारात गेले. पंडित नेहरूंनी पंतप्रधान होताच जाहीर केल्याप्रमाणे सर्व काळ्याबाजारवाल्यांना रस्त्याच्या दुतर्फा झाडावर टांगून फाशी दिले ! तरीही देशाची लोकसंख्याच घोडदौडीने वाढत गेल्यामुळे सर्व उपाय थकून अखेर आपण अमेरिकेतून धान्य आणू लागलो ! जसजशी वर्षे गेली आणि अमेरिका आपल्याला अधिक धान्य देऊ लागली तसतसा अमेरिकेविषयीचा आदर वाढत्या श्रेणीने गुणित होऊ लागला. २०४७ साली तो ‘ शतगुणित ’ होईल. परंतु तेव्हा आम्ही नसू ! असो. जगातल्या इतर कोणत्याही शोधापेक्षा, कोलंबसाने लावलेला अमेरिकेचा शोध हाच भारताच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ शोध होय, असे आता आमचे मत आहे.

[ पृष्ठ ५५ वर ]

# आधुनिक विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

## नव्या घरचे वळण....


“ पोरी ! तू शहरात वाढलेली. आमचं घर खेड्यातलं. या घरचे रीतिरिवाज झेपतील तुला ? या घरचे वळण पेलेल तुला ?”

सूनबाईने काहीच उत्तर दिले नाही. डोक्यावरचा पदर तिने आणखी थोडा खाली ओढला. वाकलेली मान तिने अधिकच वाकवली. तिच्या त्या निःशब्द कृतीने तिच्या घरचे वळण आणि शिक्षण तिच्या सासूबाईंना समजले होते.

......एक नवे नाते जोडण्यासाठी — नील आर्मस्ट्राँग लवकरच चंद्रावर पाऊल टाकणार आहे ! चंद्रावर उतरल्यावर नीलला चंद्राकडून पहिला प्रश्न हाच विचारला जाईल, “ या घरचे वळण झेपेल तुला ?”

आणि नीलचे चंद्रावरचे पहिले पाऊल वाकडे पडू नये म्हणून अमेरिकन शास्त्रज्ञांनी वारेमाप मेहनत घेतलेली आहे. अंतराळ प्रवास सोपा आहे. चंद्रावर उतरणेही ठीक आहे; पण चंद्रावर उतरल्यावर काही सेकंदांच्या आत चंद्रावरच्या गुरुत्वाकर्षणाची सवय करणे खरोखरीच कठीण आहे. पृथ्वीवर नेहमीचे गुरुत्वाकर्षण होते. अंतराळयानात गुरुत्वाकर्षणच नव्हते. आणि आता चंद्रावर फक्त पृथ्वीच्या सहावा हिस्सा गुरुत्वाकर्षण असेल ! या गुरुत्वाकर्षणाची सवय अंतराळवीरांना व्हावी म्हणून अमेरिकन शास्त्रज्ञांनी गेली अनेक वर्षे सक्त मेहनत घेतलेली आहे. अमेरिकेच्या अंतरिक्ष विभागाने व्हिर्जीनाला त्यासाठी एक खास प्रयोगशाळा उभारली होती. या प्रयोगशाळेत अंतराळवीरांना तीन वर्षे वेगळ्या प्रकारचं शिक्षण दिलंय. त्या शिक्षणाची काहीशी कल्पना सोबतच्या दोन चित्रांवरून येऊ शकेल. [ आकृती क्रमांक १ आणि २. ]


तुम्ही वर गच्चीत उभे आहात आणि घराच्या भिंतीवरून एक माणूस चालतो अशी कल्पना करा.



[क्र १]
अंतराळवीरांना शिक्षण

सोबतच्या चित्रातील अंतराळवीर नेमके तेच करतोय. त्याच्या पाठीला चाळीस फूट लांबीची जाड तार बांधलेली आहे. ती तार वर लावलेल्या दुसऱ्या एका तरंगत्या तारेला जोडलेली आहे. आता या अशा स्थितीत भिंतीवरून चालताना अंतराळवीराला नेमके चंद्रावर असते तेवढे गुरुत्वाकर्षण अनुभवावयास मिळते. चंद्रावर चालताना आणखी एक अडचण आहे. जमिनीचा भुसभुशीतपणा आणि कमी गुरुत्वाकर्षण यांमुळे आणखी एक अडचण येईल: आपले पाय जमिनीत खंबीरपणे रोवलेले आहेत असे माणसाला कधी वाटणारच नाही. आपले पुढचे पाऊल नक्की कुठे पडणार याचा अंदाज यावयासही वेळ लागेल. थोडक्यात, चंद्रावर नवा माणूस दारुड्यासारखा झोकांड्या देत चालेल. त्याचे पाऊल वाकडे पडेल. या स्थितीचे शिक्षण देण्यासाठी क्रमांक दोनचे यंत्र बनवलेले आहे. त्या आकृतीत दाखवलेल्या चक्रावरून चाललेले आपले अंतराळवीर चंद्रावरच काय, पण कोणत्याही ग्रहावर सुखाने नांदू शकतील !

— नील आर्मस्ट्राँगचे पहिलेच पाऊल सांगेल चंद्राला, पृथ्वीवरचे वळण काय आहे ते !



[ क्र. २ ]
या चक्रावर अंतराळवीरांना चंद्रावर चालण्याचे प्रशिक्षण दिले गेले.


# अंतराळवीरांची कवचकुंडले

माणसाने काळजी तरी किती करायची ......

महाराजांच्या प्रवासाकडे डोळे लावून, महाराजांच्या बिछान्यावर झोपलेल्या हिरोजी फर्जंदला विचारा —

— प्रवास अंतराळवीरांचा ! जोखीम अमेरिकन शास्त्रज्ञांची ! वैऱ्याच्याही मनात येणार नाहीत अशा अनेक अशुभ शंका मनात येतात. त्या साऱ्यांचा विचार करावा लागतो. समजा, घडू नये ते घडले, अंतरिक्षयानातील एखादे महत्त्वाचे यंत्र काम देईनासे झाले. अंतरिक्षयान बंद पडले ! काय होईल त्या वेळी आपल्या अंतराळवीरांचे ? त्यांना का त्या स्थितीत पृथ्वीभोवती प्रदक्षिणा घालत अनंत काळपर्यंत राहावे लागेल ? त्यांना का 'लायकाची' वीरगती प्राप्त होईल ?

या एका प्रश्नाने अमेरिकन शास्त्रज्ञांची अनेक दिवस झोप उडविली होती. पण तो प्रश्न आता तसा संपला आहे. अमेरिकेच्या अंतरिक्षविभागात काम करणाऱ्या कॅडवेल जॉन्सन या तरुण इंजिनीअरने या प्रश्नाचा निकाल लावला आहे. उद्या अंतराळवीरांच्या बरोबर जॉन्सनने दिलेली कवचकुंडले असतील. अमेरिकेच्या अंतरिक्ष विभागाने या कवचकुंडलांचे [ Escape Cocoon ] जागतिक हक्क नुकतेच नोंदवले आहेत. हक्क क्रमांक ३,३०,५१० प्रमाणे नोंदवल्या गेलेल्या या कवचकुंडलांत खालील सोय आहे. अंतरिक्षयान बंद पडले तर अंतराळवीर या कवचकुंडलात प्रवेश करतील. अंतराळवीरांनी त्यात प्रवेश कसा करावयाचा, त्यानंतर



[ क्र. ३ ]
**Escape Cocoon**
**...रेखाचित्रे**

त्यांनी त्यात कोणत्या स्थितीत पडून राहावयाचे याची चित्रेसुद्धा जॉन्सनने काढून स्वतःच्या संशोधनावरोबरच सादर केली आहेत. खुद्द जॉन्सनने काढलेली ती चित्रे वर दिली आहेत. [ आ. क्र. तीन ]

ही कवचकुंडले एका खास स्वरूपाच्या नायलॉनच्या धाग्यांनी बनविलेली आहेत. त्यांच्या बाहेरच्या बाजूला उष्णतावहनाला प्रतिबंध करणारे कापड लावलेले आहे. आणीबाणीच्या वेळी बंद डब्यात ठेवलेली ही कुंडले अंतराळवीर बाहेर काढेल. त्यापूर्वी एक खास प्रकारचा कपडा [ Extra vehicular pressure suit ] त्याला अंगावर चढवावा लागेल. प्राणवायूचा पुरवठा करणारे नळकांडे पण त्याच्याबरोबर असेल. या कवचकुंडलांत शिरल्यावर त्या कुंडलाला असलेल्या खिडकीतून तो बाहेरच्या दिशेचा अंदाज घेईल. त्याच्याबरोबर असलेली विद्युत् दुर्बीण पृथ्वीवर जाण्यासाठी त्याने कोणत्या दिशेने क्षेपणास्त्र सोडले पाहिजे हे त्याला समजावून देईल. कुंडलाला जोडलेले क्षेपणास्त्र त्याला क्षितिज पातळीशी थोडे कलते करून उडवावे लागेल.

त्या कवचाचा प्रवास सुरू झाल्यावर त्याचा आकार आपोआप चेंडूसारखा बनेल. या कवचात आणखी एक सोय केलेली आहे. एकदा का हे कवच पृथ्वीच्या वातावरणात शिरले की एक शिटी वाजविली जाईल. अंतराळवीराने कवचाच्या बाहेर पडावे याची ही सूचना असेल. पृथ्वीपासून १५,००० फूट अंतरावर आल्यावर हे कवच सेकंदाला दोनशे फूट या गतीने प्रवास करील. त्या वेळी दुसरी एक शिटी वाजविली जाईल. या वेळपर्यंत हवाई छत्री [ Parachute ] हातात घेऊन अंतराळवीर तयार झालेला असेल. या हवाई छत्रीवरोबर आणखीही काही गोष्टी त्याच्यावरोबर असतील. अन्न, पाणी, पाण्यावर तरंगणारा पोषाख आणि रेडिओ संदेश देणारी बॅटरी त्याने बरोबर ठेवलेली असेल.

# नऊ....दहा....अकरा....

अपोलो नऊ, अपोलो दहा, अपोलो अकरा—या तीनही अपोलोत एक साम्य आहे. या तिघांच्यांतही चांद्रयान बसवलेले होते.


—अपोलो ११ म्हणजे वामनमूर्ती चांद्रयानाने उचललेले तिसरे पाऊल ! चांद्रयान् हा खास अमेरिकन शास्त्रज्ञांचा शोध आहे. चांद्रयान म्हणजे अमेरिकन शास्त्रज्ञांनी रशियन शास्त्रज्ञांच्यावर केलेली कुरघोडी !

अपोलो ९ मध्ये चांद्रयान अपोलोपासून वेगळे करण्याचा व पुन्हा अपोलोला जोडण्याचा प्रयोग करण्यात आला. त्यासाठी एकूण सहा तास लागले. त्यानंतर चांद्रयान पुन्हा अपोलोपासून वेगळे करण्यात आले. त्या चांद्रयानात बसून अंतराळवीरांनी ११० मैलांचा फेरफटका मारला. अंतराळवीर परत येताना चांद्रयान अंतराळातच सोडून आले. अपोलो १० च्या वेळी चांद्रयान चंद्राच्या कक्षेत गेले. चंद्रापासून फक्त नऊ मैल उंचीवरून त्याने चंद्राभोवती घिरट्या घातल्या. चंद्रावर उतरावयास योग्य अशा जागेची टेहळणी केली. अपोलो १० च्या चांद्रयानाने कसा

## मधुचंद्र आणि घटस्फोट....

चंद्र अनंत काळपर्यंत आपल्या पृथ्वीभोवती रुंजी घालत राहील का ?—आपल्या भोळ्या भाबड्या मनाला तसे वाटते. पण या प्रश्नाचे शास्त्रीय उत्तर थोडे वेगळे आहे. डॉ. हॉइल यांच्या मते एकवेळ चंद्र पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर पडेल. सूर्याभोवतालचा एक स्वतंत्र ग्रह म्हणून तो नांदावयास लागेल.

चंद्र आज पृथ्वीपासून सुमारे अडीच लाख मैलांवर आहे. पण दरवर्षाला सात फूट या गतीने तो आता सूर्याकडे सरकतो आहे. ज्या वेळी चंद्र पृथ्वीपासून दहा लाख मैल अंतरावर जाईल त्या वेळी तो पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर पडून सूर्याभोवतालचा ग्रह म्हणून अस्तित्वात येईल. ज्या वेळी चंद्र पृथ्वीपासून काडीमोड घेईल त्या वेळी चांदण्या रात्री कधीच उगवणार नाहीत. सूर्यग्रहण, चंद्रग्रहण या गोष्टी इतिहासजमा होतील. भरती ओहोटी कायमची थांबेल. पण त्यावेळेपर्यंत माणूस पाहिजे तेवढे नवे चंद्र निर्माण करण्यालाही समर्थ बनलेला असेल...चंद्र केव्हाही काडीमोड घेवो ! चंद्राने पृथ्वीवर केलेले उपकार पृथ्वी कधीच विसरू शकणार नाही ! डॉ. वाइजर यांच्या मते अब्जावधी वर्षांपूर्वी पृथ्वीवरचा दिवस फक्त दहा तासांचा होता. पण चंद्राच्या आकर्षणामुळे पृथ्वीवर भरती ओहोटी सुरू झाली. या भरती ओहोटीमुळे निर्माण होणाऱ्या घर्षणाचा पृथ्वीच्या स्वत:भोवतालच्या गतीवर परिणाम झाला. आणि शेवटी त्यातूनच आजचा चोवीस तासांचा दिवस निर्माण झाला.




प्रवास केला याची कल्पना वरील आकृतीवरून येईल.

१. अपोलोचा चंद्राच्या कक्षेत प्रवेश.

२ दोन अंतराळवीर चांद्रयानात प्रवेश करतात.

## पुरुषस्य भाग्यम्...

तुम्ही ब्रह्मचारी असाल तर विश्वासही बसणार नाही तुमचा, पण ही खरीखुरी घडलेली गोष्ट आहे. केवळ दोन महिन्यांपूर्वी अमेरिकेत घडलेली ही एक शंभर टक्के सत्यकथा आहे!

आपल्या कथानायकाचे नाव आहे डेविड ग्रेगरी वुड. वुड हा एक भलताच ग्रेट माणूस आहे. सदतीस वर्षांचा हा तरुण इंजिनीअर म्हणजे अमेरिकेच्या अंतरक्षविभागाचे भूषण आहे. अपोलो ९ आणि दहा मधील चांद्रयानाचे इंजिन 'सर्व्हिस प्रोपल्शन सिस्टिम' वर काम करीत होते. त्या इंजिनची कल्पना, रचना सारे काही वुडने केलेले होते. गुप्ततेसाठी अमेरिकेने काही दिवस ही बातमी बाहेर फोडली नव्हती. शेवटी एक दिवस ही बातमी प्रसिद्ध करण्याचे ठरले. वृत्तपत्रकार ही बातमी वुडच्या बायकोला सांगण्यासाठी त्याच्या घरी गेले. मोठ्या उत्साहाने त्यांनी वुडच्या बायकोला ती बातमी ऐकविली.

त्या बाईने प्रथम सर्वांच्याकडे अविश्वासाने पाहिले. मग मान उडवून मोठ्या निश्चयी स्वरात ती म्हणाली, "हं! उगाच काहीतरी थापा मारू नका. अहो, काल ना स्वयंपाकघरातला नळ मोडला होता. तो साधा नळ काही यांना दिवसाभरात दुरुस्त करता आला नाही....आणि 'हे' म्हणे आमच्या चांद्रयानातले इंजिन बनवणार!"

३. चांद्रयान अपोलोपासून विलग करण्याच्या स्थितीत जाते.

४ व ५. चांद्रयान अपोलोपासून विलग होते आणि चंद्रापासून नऊ मैल अंतरावर एका लंबाकृती वर्तुळात प्रवेश करते.


६. चांद्रयान अपोलोच्या वर्तुळाला मिळण्याच्या दिशेने प्रवासाला सुरुवात करते.

७. चांद्रयान अपोलोला जोडले जाते. त्यानंतर चांद्रयानातील प्रवासी अपोलोत प्रवेश करतात.

८. चांद्रयान अपोलोपासून वेगळे करून अंतराळात सोडून दिले जाते.

९. अपोलोचा पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू होतो.

अपोलो ११ चे चांद्रयान काय काम करणार याची कल्पना खालील आकृतीवरून येईल.




१. अपोलो ११ चे चंद्रापासून ११५ किलोमीटर अंतरावर चंद्राच्या कक्षेत वर्तुळाकार भ्रमण सुरू होते.

२. अंतराळवीर चांद्रयानात प्रवेश करतात.

३. चांद्रयान अपोलोपासून अलग होते.

४. चांद्रयान चंद्राच्या पृष्ठभागावर विमानाप्रमाणे घिरट्या घालून उतरावयास योग्य जागेची निवड करते.

५. अंतराळवीर चंद्रावरचे काम संपवून परतीचा प्रवास सुरू करतात.

६. अपोलो चांद्रयानाचे स्वागत करण्याला सज्ज होते.

७. चांद्रयान अपोलोला जोडले जाते व चांद्रयानातील प्रवासी अपोलोत प्रवेश करतात.

८. चांद्रयान अपोलोपासून अलग करून अंतराळात सोडून दिले जाते. त्यानंतर अपोलोचा पृथ्वीच्या दिशेने प्रवास सुरू होतो.

□ □

# आपली सूर्यमाला

| ग्रहाचे नाव | सूर्यापासूनचे अंतर मैलांत | सूर्याभोवतालच्या भ्रमणाचा एकूण वेळ | स्वतःभोवतालच्या भ्रमणाचा वेळ |
|---|---|---|---|
| मर्क्युरी | ३६,०००,००० | ८८ दिवस | ८८ दिवस |
| व्हीनस | ६७,२४०,००० | २२५ दिवस | ३० दिवस...? |
| पृथ्वी | ९३,०००,००० | ३६५·३ दिवस | २३ तास ५६ मिनिटे |
| मार्स | १४१,०००,००० | ६८७·० दिवस | २४ तास ३७ मिनिटे |
| ज्युपिटर | ४८३,९००,००० | ११·८६ वर्षे | ९ तास ५० मिनिटे |
| सॅटर्न | ८८७,०००,००० | २९·४६ वर्षे | १० तास २ मिनिटे |
| युरॅनस | १,७८५,०००,००० | ८४·०१ वर्षे | १० तास ४५ मिनिटे |
| नेपच्युन | २,७९७,०००,००० | १६४·८ वर्षे | १५ तास ४८ मिनिटे |
| प्लुटो | ३,६७०,०००,००० | २४८·४ वर्षे | माहीत नाही |

| ग्रहाचे नाव | व्यास [मैलांत] | वस्तुमान (Mass) [पृथ्वी = १] | गुरुत्वाकर्षण [पृथ्वी = १] | अधिकात अधिक तपमान [फॅ. मध्ये] |
|---|---|---|---|---|
| मर्क्युरी | ३,१०० | ०·०५६ | ०·३८ | ७७० |
| व्हीनस | ७,७०० | ०·८२ | ०·८८ | २१२(?) |
| पृथ्वी | ७,९२७ | १·०० | १·०० | १३६ |
| मार्स | ४,२५० | ०·१०६ | ०·३९ | ८० |
| ज्युपिटर | ८८,७०० | ३१८·३५ | २·६५ | –२१५ |
| सॅटर्न | ७१,५०० | ९५·३ | १·१७ | –२४५ |
| युरॅनस | २९,४०० | १४·५४ | १·०५ | –३०५ |
| नेपच्युन | २८,००० | १७·२ | १·२३ | –३२५ |
| प्लुटो | ३,६०० | ०·०३(?) | ०·१६(?) | –३५० |
| सूर्य | ८६५,००० | ३३२,१००·० | २८·०० | १०,३०० |

# अंधार-उजेड



## आले देवाजीच्या मना

एक भावना असते हुरहुरीची. तिला एक महान निष्ठा ग्रासते. पुढे मग ही निष्ठा निवृत्त होते. तेव्हा ऐन यौवनातील ती तशीच दडपली गेलेली हुरहूर पुन्हा जागृत होते, नव्या बहराने फुलते; पण अकस्मात नियतीचा घाला पडतो. बहरलेली हुरहूर कोमेजते व पुन्हा तिला निष्ठेचे आवरण चढते.

हा सारा भावनांचा खेळ. पद्मश्री कु. विद्या पंडित यांनी भोगलेला व सोसलेलाही! प्रमातली एक नाजूक अवस्था त्यांनी एका महान स्वार्थत्यागाखाली मोठ्या हळुवारपणे, कळते न कळते अशा स्थितीत जपली आणि तिचा प्रत्यक्ष आविष्कार करण्याची वेळ आली, तेव्हा दुर्दैवाने तिच्यावर असा काही कठोर आघात केला, की ती मुळातच उखडली गेली.

मो. ग. रांगणेकर यांच्या 'आले देवाजीच्या मना' या नव्या नाटकातील नायिकेच्या भाव-भावनांची ही कथा सुरू होते उदात्तपणे आणि संपते विकलांग होऊन! हे नाटक शोकान्त आहे आणि शोकान्त आहे म्हणूनच तरले आहे; नाटक म्हणून उभे राहिले आहे.

कु. विद्या पंडित (माई) या एका कन्या शाळेच्या चालिका आहेत. हे चालिकापद त्यांच्याकडे वारसाहक्काने आलेले आहे. त्यांच्या वडिलांनी – अण्णांनी – ती शाळा सुरू केली. मुलींना केवळ शिक्षण न देता, त्यांचा नैतिक विकास करण्याचा, त्यांच्यातून उत्तम सुगृहिणी बनविण्याचा त्यांचा हेतू होता. थोडक्या अवधीत पुण्यामध्ये शाळेचा नावलौकिक झाला. पालक विश्वासाने या शाळेत मुलींना पाठवू लागले. अण्णांचा देहान्त झाला तेव्हा त्यांनी ही शाळा विद्याबाईकडे सोपविली व आपण निर्माण केलेला आदर्श जपण्याची शपथ घातली. विद्याबाईंनीही हे व्रत स्वीकारले. त्या वेळी त्यांचे वय तिशीत होते. ही झाली पार्श्वभूमी!

नाटकात प्रत्यक्ष दाखविल्या आहेत त्या त्यांच्या तिशी, चाळिशी व पन्नाशी या तीन अवस्था. हा सबंध काळ त्या आपल्या मनातील सर्व भावना दाबून फक्त अण्णांना दिलेला शब्द पाळतात. त्यासाठी शाळेत शिस्तीचा कठोर अंमल चालवितात. शिक्षकांत किंवा विद्यार्थ्यांत प्रेमाची पुसटशी चाहूल दिसली तरी ती दडपून टाकण्याचा

प्रयत्न करतात; त्यासाठी कठोर शिक्षा देतात. यामुळेच शाळेतील संगीत शिक्षिका मिस् रत्ना परांजपे व विद्यार्थिप्रिय शिक्षक गोखले यांचे प्रेमप्रकरण वेळीच नाहीसे करण्याची दक्षता घेतात व ते पुन्हा उपटते तेव्हा शाळेतून काढून टाकतात. शाळेचा आदर्श जपण्यासाठीच अकरावीतील विद्यार्थिनी शीला कान्हेरे हिच्यावर प्रेम करणारा कॉलेजयुवक शशी जठार याला अतिशय निष्ठुरपणे बजावतात.

तीसहून अधिक वर्षे अशा तऱ्हेने शाळेत कोणालाही प्रेम करू न देता शिस्तीचा कडक अंमल चालविल्यावर माई कृतकृत्य होतात. अण्णांना सश्रद्ध अंतःकरणाने नमस्कार करून, जपलेल्या निष्ठेची, आदर्शाची पोच देतात व निवृत्तीच्या तयारीला लागतात.

निष्ठा मिटते. कॉलेजात अनुभविलेली हुरहूर जागृत होते, कॉलेजातला तरुण — मेजर प्रताप राणे — त्यांची वाट पाहत थांबलेला असतो. उर्वरित आयुष्य त्याच्याबरोबर घालविण्याचे माईंनी योजिलेले असते. तसे पत्रही त्यांनी मेजरना लिहिलेले असते. ठरलेल्या दिवशी प्रताप येणार असतात. शाळेतील उपस्थितांच्या घरगुती समारंभात माई आपल्या विवाहाची घोषणा करणार असतात व प्रतापबरोबर बंगलोरला जाणार असतात कायमच्या. त्यांची सर्व तयारी झालेली असते. प्रतापला आवडणारे पापडही त्यांनी स्वतः जाऊन दुकानातून आणलेले असतात.

पण मेजर प्रताप राणे येत नाहीत. सायंकाळ झाली तरी प्रतापच्या गाडीचा आवाज येत नाही. माई अधीर होतात. एवढ्या म्हातारपणी त्यांना नवयौवनेची उत्फुल्लता फार काळ सहन होत नाही. पापड आणता आणताच त्या ठेच लागून पडतात. पापडांचा चुराडा होतो. माई आत येतात. प्रतापचा मित्र आलेला असतो. त्याच्या हातात एक तार असते... 'बंगलोरहून ताशी १०० मैलांच्या वेगाने निघालेला प्रताप शहरापासून केवळ चार मैल अंतरावर लष्करी ट्रकचा धक्का लागून ठार झाला.'

माईंना हा आवेगी धक्का सहन होत नाही. त्या कोलमडतात, पण दुसऱ्या क्षणी स्वतःला त्या सावरतात. आयुष्यभर जपलेले निष्ठेचे व्रत त्यांच्या कामी येते. धडपडत त्या चालिकेच्या खुर्चीत जाऊन बसतात. म्हणतात, "तो (प्रताप) म्हणालाच होता, की, मी या चार भिंतींबाहेर कधी जाणारच नाही. बाहेर गेलो तर माझा श्वासोच्छ्वास बंद होईल, माझे पाय चालायचेच थांबतील, हात उचलायला नकार देतील, डोळे काही पाहूच शकणार नाहीत, कान काही ऐकू शकणार नाहीत, या चार भिंतींबाहेर मला निराळे काही आयुष्यच जगता येणार नाही..."

नियतीने क्रूर डाव साधला होता. एका फुलू पाहणाऱ्या वठलेल्या आयुष्याला नामोहरम केले होते.

माईंच्या या भावनांचा खेळ अतिशय तरल पातळीवरचा आहे. मन हेलावून टाकण्याची त्यात ताकद आहे, पण या नाटकात तो अतिशय ठोकळपणाने मांडला

आहे. नाटकाचा कल्पनाविषय आणि त्याची रचना यांचा मेळ जमलेला नाही. एखाद्या सुरेख संकल्पनेच्या मनोरम चित्राला कारागिराने, देवाच्या चित्रांना करतात तशी बोजड लाकडी चौकट करावी व चित्राचे सौंदर्य हरवून बसावे तसेच या नाटकाचे झाले आहे. विषयाची महानता व परिणामकारकता नाटककाराला उमजलीच नाही, असे वाटावे, अशा पद्धतीने चुकीच्या चौकटीत मांडलेले हे नाटक अकारण गोष्टींवर भर देते. वेगवेगळ्या पातळ्यांवर एकाच वेळी चढउतार करते व निष्प्रभ होते.

एकट्या माईंच्या व्यक्तिमत्त्वात प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे हेसुद्धा श्री. रांगणेकर यांना उमजले नसावे; नाहीतर प्रेक्षकांच्या रंजनासाठी त्यांनी अनाठायी विनोदाचा वापर केला नसता. यामुळे नाटकात योजलेले संवाद माईंच्या व इतर व्यक्तिरेखांच्या मनाचे पापुद्रे दाखविण्याऐवजी प्रेक्षकांचे रंजन करतात व प्रसंगांचे गांभीर्य घालवून बसतात. माई आणि रत्ना परांजपे यांच्यांतील प्रेम आणि कर्तव्य यांसंबंधीचे बोलणे हे याचे उत्तम उदाहरण! रत्नाबाईंना त्यांच्या प्रेमप्रकरणापायी शाळेतून काढण्याच्या गोष्टी माई बोलत असतात, तर रत्नाबाई लग्न ही किती नैसर्गिक गोष्ट आहे हे पटवून देत असतात; पण माईंचे बोलणे मध्येच उचलून रत्नाबाई म्हणतात की, 'मीही (माझ्या कडेवर माझे मूल आणून) दाखवीन.' हे अतिशय अप्रस्तुत शब्दांचे वाक्य म्हणताना वर आणखी रत्नाबाई लाजल्याचा अभिनय करतात! गंभीर प्रसंगांत हा असला रंजनात्मक विनोद घुसडण्याचा प्रकार रांगणेकरांसारख्या अनुभवी दिग्दर्शकाकडून अपेक्षित नव्हता.

पण हे असे प्रसंग आणि रसभंग करणारे संवाद अनेक ठिकाणी आहेत. सर्वच संवाद अतिशय वरवरचे व रूढ आहेत. 'माई, तुम्ही कधी प्रेम केलं आहे काय?' इतक्या स्पष्ट शब्दांत वेगवेगळी चार पात्रे निदान दहा वेळा तरी माईंना हा प्रश्न विचारतात व माईंची कार्यनिष्ठा त्यांना काही बोलू देत नाही. वडिलांना दिलेले वचन म्हणून माई चालिकेचे व्रत स्वीकारतात. ही उदात्त भावना एखाद्या हिंदी चित्रपटात शोभावी अशा तऱ्हेने वारंवार त्या बोलून दाखवितात व पुनःपुन्हा अण्णांच्या छायाचित्रापुढे जातात.

पहिले दोन अंक अयुक्त संवादांच्या पुनरावृत्तीने ढिसाळ व रटाळ झाले आहेत. कोणत्याही प्रसंगाचा, त्यातील भावनेच्या किंवा कालमर्यादेच्या दृष्टीने तोल राहिलेला नाही. पात्रांच्या वागण्यात सुसंगती नाही.

कथानकाला एकदम अनपेक्षित वळण दिल्यामुळे तिसरा अंक मात्र प्रभावी वाटतो. एका पन्नाशीच्या बाईची उत्फुल्ल मनोवस्था, श्री. रांगणेकर यांनी पहिल्या दोन अंकांशी तुलना करता बरीच चांगल्या तऱ्हेने चितारली आहे; पण हा अंक यशस्वी करण्यात त्यांच्याहूनही अधिक यश संपादिले आहे माईंची भूमिका करणाऱ्या सुमन धर्माधिकारी यांनी. रांगणेकरांना लेखनात न साधलेली तरलता


त्यांनी समर्थ भावाविष्काराने कमालीची जिवंत केली आहे. आधीच्या दोन अंकांतील त्यांच्या कामापेक्षा या अंकात त्यांनी कमाल केली आहे.

श्री. रांगणेकर यांनी नाटकाच्या वेळी कलावंतांची नावे जाहीर केली नाहीत किंवा पुस्तकातही ती दिलेली नाहीत म्हणे ! 'नाटक हे कलावंतांवर चालते' हे म्हणणे त्यांना मान्य नाही असे ते म्हणतात. पण या नाटकात तरी सुमन धर्माधिकारी (यांचेही नाव मला असेच ऐकू आले. अधिकृतपणे कळले नाही.) यांनीच त्यांना तारले आहे. एक फसलेले नाटक त्यांनी उभे ठेवले आहे.

मेजर प्रताप राणे यांच्या भूमिकेतील श्री. विभाकर विवलकर यांनी त्यांना चांगली साथ दिली आहे. बाकी सर्व व्यक्तिरेखा त्यांच्या कमकुवत चित्रणास साजेशाच आहेत.

पंचवीस वर्षांच्या नाट्यसेवेनंतर गेली दोन वर्षे रिकामी गेली व आता 'नाट्यनिकेतन' ने हे नवे नाटक सादर केले आहे.

— दिनकर गांगल



# स मी र

## चं द्र शे ख र

सेंट्रल कॅलकटा–अंबर बार–दुपारचे दोन वाजले आहेत. बियर आणि तंदुरी या दोन पंखांनी आम्ही स्वैर संचार करीत आहोत. आम्ही म्हणजे मद्रासचे एक पंजाबी बिझिनेसमन धिंग्राजी, त्यांचे तीन पंजाबी मित्र आणि ए जर्नालिस्ट फ्रॉम बाँबे मि. चंद्रशेखर !

सकाळी दहापासून सेशन बसले आहे. मंडळी अस्खलित पंजाबीत भावनांची उधळण करीत आहेत. मल्होत्रासाहेब माझ्या हाताचे चुंबन घेतात आणि मी तटकन् उठतो. सिगारेट अॅशट्रेमध्ये विझवीत जाहीर करतो,

" यार लोग, अब इजाजत चाहता हूं. "

" वा यार, ये क्या दुनियादारी है ? बाशाओ, अब तो मैफिल चढने लगी है– इतने संगदिल ना बनो " वगैरे गदारोळ उठतो. धिंग्रा एकदम पिसाळतो. मल्होत्रा या अजीजीने विचारतात, " इतनी जल्दी भी क्या है गुरु ? "

मी अस्वस्थपणे तोंडावरून हात फिरवीत सुचेल ती सबब सांगतो– ' साहेबा, हमें ज्योतिबाबूसे मुलाकात करनी है ! ' मल्होत्राशेठ गडगडाटी हसतो आणि सगळ्या बारला ऐकू जाईल एवढ्या आवाजांत पृच्छा करतो, " ऐसी क्या खुबी है उनमें जी भरी मैफिल छोडकर आप जा रहे हैं ?"

" उनका नशा हमसे कई गुना गहिरा है, सेठ. " मी एक एक शब्दावर जोर देत सांगतो आणि निघतो.

नशेचा वास्ता दिल्यावर सारे सेठ लोक राजी होतात आणि माझ्या नावाने आणखी एक बियर फोडली जाते. रायटर्स बिल्डिंगकडे माझी टॅक्सी धावू लागते.

ज्योतिबाबूंची गाठ पडत नाही. सात दिवस सतत प्रयत्न करूनही. मी त्यासाठी रायटर्स बिल्डिंगमध्ये धरणे धरले आहे. रासबिहारी अव्हेन्युजवळील त्यांच्या ' बाडीत ' गेलेलो आहे. ज्योतिबाबू दार्जिलिंगला गेले त्या वेळेस त्यांच्या विमानात सीट मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. दार्जिलिंगहून ते परत आल्यावर सकाळी सहा वाजता त्यांच्या घरी टेलिफोन केलेला आहे. (– आणि त्यांनी टेलिफोनवर आपली अगतिकता व्यक्त केली आहे ! वेळ नाही, पाच–दहा मिनिटांत काय बोलणार ?)

अखेरीस ज्योतिबाबूंची मुलाखत न होताच मला पुण्याला परतावे लागले आहे.

# कलकत्ता दिनांक.... ५

असे जरी असले तरी 'ज्योति' ही प्रेरणा मी कलकत्त्यात पाय ठेवल्यापासून माझी संगत करीत होती. कोणी ज्योतीला शिव्या देत होते तर कोणी त्याला देवता मानीत होते. ज्योतिबाबूंच्या अनेक आख्यायिका व व्यक्तिगत विशेष यांची मला चांगली माहिती झाली आहे. 'ज्योति बसू' या विषयाबर एक स्वतंत्र लेख मी लिहू शकेन. पण बंगाली राजकारणात आज कोणाही एका व्यक्तीला तेवढे प्राणभूत महत्त्व नसल्याने तो मोह मी टाळीत आहे.

तरी या असामीबद्दल दोन शब्द लिहिल्याखेरीज बंगालची स्टोरी पुरी होणार नाही. शांत, विचारांत गढलेला, सौम्य आवाजाचा हा बंगाली नेता राजकारण्यापेक्षा एखाद्या कलावंतासारखा दिसतो. भारतीय राजकारणाच्या स्टॅंडर्डप्रमाणे हा तरुण आहे. लोकांवर विलक्षण विश्वास असलेला हा नेता कसलेही संरक्षण न घेता गावोगाव फिरतो.

रासबिहारीवरील त्याचे घर दोन-तीन खोल्यांच्या फ्लॅटमध्ये आहे. तेथे ना गुरखा, ना दरवान, ना कोणी सेक्रेटरी. दारावर पाटी आहे– 'ज्योति बसू– एम्. एल्. ए.' सरकारी निवासात ज्योतिबाबू राहावयास गेलेले नाहीत. सरकारच्या कोणत्याही सवलतींचा ते लाभ घेत नाहीत. नेहमीच्या इंडियन एअरलाईन्सच्या विमानाने ते प्रवास करतात. एअरपोर्टवर ते कधीही व्ही. आय. पी. लाउंजमध्ये जात नाहीत. चारचौघांसारखे येतात-जातात.

मी तेथे असताना त्यांचा दार्जिलिंगला दौरा झाला. नक्षलवादी त्यांना घेराओ करणार आहेत, अशी दाट वदंता होती. ज्योतिबाबू बेधडक दार्जिलिंगला गेले. त्यांचा दौरा शांतपणे पार पडला. अगदी अलीकडे त्यांच्या घरावर बॉंब टाकण्याची धमकी देण्यात आली होती. हा प्राणी कमालीचा शांत आहे. पंचवीस वर्षे राजकारणात खेळलेला आहे. 'भीति' हा शब्दच त्याला ठाऊक नाही!

ज्योतिबाबूंची नाही, तरी त्यांचा शाळकरी मुलगा 'चंदन' याची गाठ घेण्याचा मी प्रयत्न केला, पण ते जमले नाही. हा मुलगा रवींद्र सरोवर स्टेडियमवरील 'अशोककुमार नाईट'ला हजर होता. कलकत्त्याचा सगळा पोलीस फोर्स या मुलाला शोधीत होता, वगैरे बातम्या खोटया आहेत. ज्योतिबाबूंनी स्वतः अशा सूचना

दिल्या होत्या की, त्याची काळजी पोलिसांनी करू नये. या उप्पर काही शोध झाला असल्यास ते अपरिहार्य म्हणावे लागेल. चंदन रात्री केव्हातरी चारचौघांसारखाच घरी आला.

कलकत्त्यातील ज्योतिबाबूंचे इमेज हे असे आहे. खोटयानाटया प्रचाराने त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न सध्यातरी व्यर्थ आहे. उभा कलकत्ता त्यांचे सर्व जीवन उघडया पुस्तकाप्रमाणे वाचू शकतो. त्यांना भेटू शकतो. कलकत्त्यात ते जेव्हा असतात तेव्हा रोज सकाळी सात ते साडेआठ आपल्या घरी कोणालाही भेटतात. प्रत्येकाचे म्हणणे थोडक्यात ऐकून घेतात. निवेदन वगैरे असले तर ते संबंधित खात्याकडे पाठवितात. ज्योतिबाबूंचा एक अत्यंत विश्वासू सहकारी ( हा सरदार आहे. ) माझा चांगला दोस्त झाला होता. त्यांच्या अनेक कथा त्याने मला भक्ति-भावाने सांगितल्या.

त्यांपैकीच ही एक. पूर्वीच्या राजवटीत परप्रांतीय लोक पोलिस ठाण्यावर काही तक्रार घेऊन गेले तर पोलिस सांगत, 'तुम्ही तुमच्या प्रांतात जाऊन का राहत नाही ? येथे का तडफडता ?' आता ही परिस्थिती राहिली नाही. पोलीस आता कोणाचेही म्हणणे निदान ऐकून घेतात—कारण ? ज्योतिबाबूंचा सक्त हुकूम !

एक व्यक्ती म्हणून भारतीय राजकारणात ज्योति बसू अपवादात्मक आहेत. बंगालच्या राजकारणातही एक राजकीय प्रेरणा म्हणून ते अपवादात्मक आहेत. साम्यवादी असले तरी परिस्थितीने असे काही फासे टाकले आहेत की ज्योति बसू आज साम्यवादी बंगालमध्ये एकाकी पडले आहेत. त्यांचे स्वतःचे सहकारी, विरोधी पक्ष, त्यांतल्या त्यात नक्षलवादी प्रेरणा—आणि आम जनता या साऱ्यांचा कमी-अधिक विरोध सहन करून ते आपला प्रवास करीत आहेत, ज्याचा शेवट आज तरी सांगणे शक्य नाही.

प. बंगालच्या राजकारणाची आजची अवस्था थोडक्यात अशी : बंगालमध्ये उजव्या विचारसरणीच्या (काँग्रेससकट) पक्षांस काडीचेही स्थान नाही. डाव्या विचारसरणीमध्ये अनेकविध छटा आहेत. उजव्या कम्युनिस्ट पक्षापासून तो नव्या बंगला – नक्षलवाद्यांपर्यंत डावेपणाचे सर्व प्रकार तेथे करंट आहेत. सर्वात प्रभावी डावा पक्ष म्हणजे अर्थातच सी. पी. एम. हा होय. पक्ष म्हणून पाहावयाचे तर हा पक्ष अतिशय शिस्तबद्ध, वैचारिक दृष्टया मातबर आणि गतिमान आहे. प. बंगालमध्ये या पक्षाचे सुमारे सोळा हजार क्रियाशील सभासद आहेत. या पक्षाचे भारतीय पातळीवरचे मुख्य केंद्रही कलकत्ता येथेच आहे. देशाच्या अनेक भागांतून येथे फुल-टाईमर्स येतात, काम करतात. वाटगंज येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी पूर्णवेळचे शिक्षणकेंद्र आहे. पी. सुंदरय्यांपासून सर्व नेते या केंद्रात स्वतः मार्गदर्शन करतात.

कलकत्त्याला सुरुवातीचे तीन दिवस मी सी. पी. एम. पासून मुद्दाम दूर राहिलो. रायटर्स बिल्डिंगपासूनही दूर राहिलो. सरोवर स्टोरी काढली. कलकत्त्याचा एकूण

सेन्स घेतला आणि मग मोर्चा सी. पी. एम. कडे वळवला.

हा पक्ष फार विचित्र आहे. उभ्या बंगालवर राज्य करीत असलेल्या या पक्षाची कचेरी कोठे आहे हे बहुतेक कलकत्तेकरांस ठाऊक नाही. त्यामुळे माझी सी. पी. एम. यात्रा फार विलक्षण झाली. तिचीच स्टोरी या लेखात प्रामुख्याने सांगावयाची आहे.

दुपारची दोनची वेळ ! टॅक्सीवाल्याला मी ३३ अलिमुद्दीन स्ट्रीट हा पत्ता रुबाबात सांगतो आणि सिगारेट ओढीत इकडेतिकडे पाहत बसून राहतो. अलिमुद्दीन स्ट्रीट येतो आणि मी चकीत होतो–एवढ्या मोठ्या सत्ताधारी पक्षाचे राज्य कार्यालय या भिकार गल्लीत ? तेथे दिवसाउजेडीही जाणे अशक्य वाटते. त्या गल्लीत टॅक्सीही जात नाही. टॅक्सी सोडून मी दमचच करतो. एक-दोनदा रस्ता चुकवून दमचकवाला मला एकदाचा ३३ अलिमुद्दीनवर नेऊन टाकतो. एक भिकार इमारत. बाहेर पाटीसुद्धा नाही. आत छापखाना वगैरे असावा. मी चडफडत आत जातो. पहिल्या मजल्यावर छापखाना व पार्टीच्या मुखपत्राचे (पीपल्स डेमॉक्रसी) कार्यालय आहे.

पक्षाचे राज्य चिटणीस प्रमोद दासगुप्तो नसतात. चार वाजता त्यांची अॅपॉइंटमेंट घेऊन मी परत फिरतो. त्यानंतर मी तीनवेळा अलिमुद्दीन स्ट्रीटवर जातो. एकदाही दासगुप्तो भेटत नाहीत. त्यांचे सहकारी भेटतात. एकाच धंद्यातील असल्याने चर्चा होते. कॉफी–चारमिनार यांच्या फैरी झडतात. मंडळी चांगली वाटतात. त्यांना फार पगार वगैरे मिळत असावा असे वाटत नाही. एक साठीच्या पलीकडचे वृद्ध श्री. मेघनाद मी मुद्दाम पुण्याहून आलो हे पाहून पुण्याची चौकशी करतात. ते केव्हा तरी पुण्याला येऊन गेले आहेत. ते पी. के. अत्रे, खापर्डे, टिळक वगैरे मंडळींची चौकशी करतात. ' पूना इज नाईस सिटी ' म्हणून सुस्कारा सोडतात.

बहुतेक पक्षीय वृत्तपत्रांपेक्षा पीपल्स डेमॉक्रसीची अवस्था निराळी नाही. सबंध देशभर मिळून दहा हजार प्रती आठवड्याला खपतात. पक्षाचे ध्येयधोरण स्पष्ट करणे व पक्षाविरुद्धच्या प्रचाराला उत्तर देणे हे या मुखपत्राचे काम. या पेप्रात विशेष दम दिसत नाही. मजकूर सगळा कंठाळी आणि स्टेल वाटतो. असे का, असे विचारता नीट उत्तर मिळत नाही. तुमची रिपोर्टिंगची काही व्यवस्था आहे का, असे मी विचारता ' नाही ' असे उत्तर मिळते. पक्षाच्या नेत्यांची भाषणे व टिपणे छापणे एवढेच माफक काम पीपल्स डेमॉक्रसी करते.

अलिमुद्दीन स्ट्रीटवरील कार्यालयाचे कोडे सुटण्यासाठी आपणास थोडे मागे गेले पाहिजे. चीनच्या आक्रमणाच्या वेळी सी. पी. एम. हा पक्ष बदनाम झाला होता. जवळजवळ बेकायदाच होता. सरकारी ससेमिऱ्यापासून सुटण्यासाठी सी. पी. एम. ची सर्व ठिकाणे अशी खबदाडात आहेत. आजदेखील सत्तेवर असूनही सर्व सी. पी. एम. पुढाऱ्यांत एक प्रकारचा ' सावधपणा ' दिसतो. त्याचे कारण ही मागची परंपरा.

सर्व सी. पी. एम. पुढाऱ्यांमध्ये अतिशय दिलखुलास व दमदार व्यक्ती म्हणजे श्री. हरेकृष्ण कोनार. रायटर्स बिल्डिंगमध्ये एका दुपारी तीन वाजता मी त्यांची अनेक वशिले लावून गाठ घेतली. एक तास हे गृहस्थ बोलत होते, हसत होते, रागावत होते. अस्वस्थपणे सिगारेट ओढत होते. मध्येच खाजगी आवाज काढून मला काही बजावीत होते. कोनार हे एक अजब व्यक्तिमत्त्व आहे. भरपूर उंची, सडसडीत शरीरयष्टी, पाठीला किंचित बाक, उभट चेहरा, उलटे वळवलेले काळे-पांढरे केस, तलवारीच्या पात्यासारखी तेज नजर आणि हाताला मध्येच झटका देण्याची खास लकब! कसल्याही शिष्टाचारांचे अवडंबर नाही. हा गुण सर्वच सी. पी. एम. पुढाऱ्यांत दिसला.

कोनार हे तिकडील शेतकरी नेते. पंचवीस वर्षे शेतकऱ्यांचे लढे लढविण्यात घालविलेली. राज्यातील सी. पी. एम. पुढाऱ्यात कोनार हे नंबर टू! आणि नक्षलवाद्यांचे हे शत्रू नंबर वन्! कारण ग्रामीण बंगाल यांना तळहातासारखा माहिती. नक्षलवादी त्यांना बनवू शकत नाहीत. कोनारांच्या लेखी नक्षलवादी म्हणजे " कॉफी हाऊस चॅटर बॉक्सेस – रबिश "!

हरेकृष्णबाबूंच्या चेंबरमध्ये घुसलो तेव्हा त्यांच्या अर्धवर्तुळाकार टेबलाभोवती दोन-चार माणसे बसली होती. कपाळावर जोरजोराने हात फिरवीत, चारमिनारचे झुरके घेत (चारमिनार हा सी. पी. एम. चा ऑफिशियल ब्रँड आहे) ते फाईल चाळीत होते. मला पाहून हसल्यासारखे करीत ते म्हणाले, " व्हॉट इज बायटिंग यू ? स्पीक आऊट. "

धक्का तंत्र हे आमचे खास वैशिष्टय. आमची बूर्झ्वा सिगारेट काढून शिलगावली आणि त्यांच्या नजरेला नजर देत बोलता झालो " यू स्पीक आऊट. आय ॲम हियर टू लिसन " कोनारबाबू पुन्हा एकदा ' तिखट ' हसले आणि म्हणाले, " अच्छा व्हॉट वुड यू लाईक टू नो ? " मी अस्वस्थपणे खोलीतल्या माणसांकडे नजर टाकली. कोनार म्हणाले, " इट्स् ऑल राईट – हे असंच चालणार. यू प्रोसीड. "

अनेक वाकडे तिकडे प्रश्न विचारून मी कोनारांचे भुस्कट पाडले. पण गृहस्थ विलक्षण दिलदार. त्याने कशाचीही भीड न बाळगता मला उत्तरे दिली. कोनारांचा मूड व भूमिका थोडक्यात देतो –

" आता हे सरकार स्थिर झाले आहे. आम्ही साम्यवाद राबवितो आहोत किंवा राबवू शकू, असा आमचा भ्रम नाही. आम्ही जे करीत आहोत तिला क्रांती वगैरे नाव देणे मूर्खपणाचे आहे. आम्ही केवळ गरिबांच्या प्रश्नांची अगदी किरकोळ दखल घेत आहोत.

" आम्हांला ग्रामीण बंगालमध्ये चांगला पाठिंबा आहे. पहिल्या आघाडी राजवटीपासून आम्ही पाच लाख एकर जमीन सात लाख भूमिहीनांत वाटली. त्यामुळे आमचे खरे बळ ग्रामीण भागात आहे.

"आम्हांला आघाडीमधील पक्षांत फूट होण्याची विशेष भीती वाटत नाही. पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील झगडयाचा उगाच बाऊ केला जात आहे. हे तंटे मुख्यत: शेतजमिनींचे फेरवाटप व युनियनमधील दुफळी यांमुळे होत आहेत. त्यांना घाबरण्याचे कारण नाही. काँग्रेस पक्षाच्या पिछेहाटीमुळे निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न आघाडीमधील प्रत्येक पक्ष करीत आहे. प्रत्येक पक्षास आपापला रोल सापडला की परिस्थिती सुधारेल.

"आमचे आजचे मुख्य काम म्हणजे केंद्रास हस्तक्षेप करण्याची संधी न देणे हे होय. त्यामुळे क्रांती वगैरे आम्हांलाही ठाऊक असली तरी नक्षलवाद्यांप्रमाणे आम्ही थयथयाट करू शकत नाही–वुई डोन्ट वॉन्ट टु बी बुचर्ड अॅज अॅट लास्ट टाईम! केंद्रदेखील आता हस्तक्षेप करण्यापूर्वी दहादा विचार करील हे लक्षात ठेवा."

कोनारांचा आत्मविश्वास पाहून मला जरा आश्चर्य वाटले. प. बंगाल आणि कलकत्ता यांच्या समस्या पाहता हा आत्मविश्वास मला गैरलागू वाटला. मी तसे बोलूनही दाखविले. कोनार म्हणाले, "खरे आहे. केंद्रामध्ये डावी सत्ता आल्याखेरीज कलकत्ता – बंगालचेच काय, कोठल्याच प्रदेशाचे प्रश्न सुटतील, असे वाटत नाही. पण हा पल्ला गाठीपर्यंत स्वस्थ तर बसता येत नाही. क्रांती अशी पावलापावलाने पुढे जात असते. आम्ही आम्हांस शक्य ते सर्व करू. पण त्याला मर्यादा आहेत."

"नक्षलवादी तुमच्याबद्दल व्यक्तिश: काय म्हणतात ते वाचले का?" असे विचारता कोनार म्हणाले, "नाही. मी अद्याप 'लिबरेशन' वाचले नाही." मी स्वयंस्फूर्तीने त्यांना, नक्षलवादी शिव्या सुनावल्या. ते दिलखुलास हसत म्हणाले, "हे नक्षलवादी मूर्ख आहेत. रबिश लेकाचे! अहो, भिंतीवर डोके आपटण्याचा हा प्रकार आहे. सशस्त्र क्रांती वगैरे गोष्टी कॉफी हाऊसमध्ये बसून बडबड करण्याच्या नव्हेत. दीज ब्लडी नक्सलाईट्स आर रोमँटिक, फ्रस्ट्रेटेड अॅट इमॅच्युअर. बेस्ट कोर्स इज टु टोटली इग्नोअर देम!"

कोनारबाबूंची भूमिका ही सी. पी. एम.ची अधिकृत भूमिका समजण्यास प्रत्यवाय नाही. ज्योतिबाबूदेखील अशीच भूमिका त्यांच्या पब्लिक भाषणातही घेतात. केंद्रामधील सत्तांतरावर त्यांच्या फार भर आहे. हे काम अवघड आहे याची सर्वांनाच कल्पना आहे. आम्ही प. बंगालचे प्रश्न सोडवून कलकत्त्याचे जीवन सुधारू असे कोनार व त्यांचे सहकारी बिलकूल म्हणत नाहीत. एक तर त्यांच्या सरकारजवळ पैसा नाही. दुसरे म्हणजे हे काम फार प्रचंड आहे. एकटया कलकत्त्यासाठी शेकडो कोटी रुपये लागतील; तेव्हा आघाडी सरकारने तीन-चार महिन्यांत काय केले हा प्रश्न निरुपयोगी आहे. आपल्याला सत्ता मिळाली ती बंगाली मतदारांच्या 'नकारात्मक मतदानामुळे' (निगेटिव्ह व्होटिंग) ही गोष्ट हे आघाडी सरकार जाणून आहे व तसे ते कबूलही करते. सरकार म्हणून आघाडीने काही गोष्टी केल्या आहेत. सरकारी

नोकरांना राजकारणात भाग घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. माध्यमिक शिक्षकांची स्थिती सुधारणारे कायदे संमत केले आहेत. बेकारी-भत्ता देण्यास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे. कलकत्त्यामधील औद्योगिक वातावरण सुधारण्यासाठी आघाडी सरकार कसोशीने प्रयत्न करीत आहे. तेथील उद्योगधंदे खालावून बेकारी वाढली तर ते सरकारला परवडण्यासारखे नाही. सध्याच कलकत्त्यात विलक्षण बेकारी आहे.

पण सरकार म्हणून आपण काही विशेष करू शकत नाही, हे आघाडीस कळून चुकले आहे. यातून आघाडीने निराळाच मार्ग काढला आहे—नकारात्मक सरकार (निगेटिव्ह गव्हर्मेंट) हा तो मार्ग होय. पक्षाचे कार्यकर्ते म्हणून जनतेला सामाजिक दडपणाने काही गोष्टी करण्यास प्रोत्साहन द्यावयाचे. उदाहरणार्थ घेराओ, जबरन-जोत वगैरे, आणि सरकारी यंत्रणेकडून या गोष्टीस अडथळा होणार नाही याची खबरदारी घ्यावयाची; असे हे तंत्र आहे. याच तंत्राने कोनारबाबूंनी पाच लाख एकर जमीन जमीनदारांकडून काढून शेतकऱ्यांमध्ये वाटली.

ही भूमिका वाटते तेवढी विचित्र नाही. राज्य सरकारच्या लँड सीलिंग कायद्या-प्रमाणे अतिरिक्त जमीनधारणा जेवढी असेल तेवढीच जमीन लोकांनी सरकारच्या आशीर्वादाने ताब्यात घेतली आहे. कोनार म्हणतात, ही जमीन धारण करणे म्हणजे जमीनदारांचे बेकायदा कृत्य आहे. त्याबद्दल आम्ही त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करीत नाही हे नशीब समजा. जमीनदारांना वाटल्यास त्यांनी कोर्टाकडे दाद मागावी. त्या ठिकाणी जो निवाडा होईल तो आम्ही मानण्यास तयार आहोत. पण तोपर्यंत जमिनी मुद्दाम पडित ठेवावयाच्या वा खोटयाच नोंदी करून त्या फिश लँड आहेत असे भासवावयाचे हे आम्हांस चालणार नाही.

'कायदा व सुव्यवस्था' या मंत्रामागील ढोंग आघाडी सरकारने ओळखले असून तोच मंत्र आता त्याच मंडळींवर उलटविला आहे हे विशेष! कायदा आम्हीही मानतो. परिस्थितीत काही फरक झाला असेल तर तो हा की तुम्ही अन्याय करावयाचा आणि गरिबांनी कोर्टात जावयाचे ही परिस्थिती आता चालणार नाही. हे आजवर जमत होते, कारण सरकारी यंत्रणा ही श्रीमंत—मालक—जमीनदार यांचाच पाठपुरावा करीत होती. मालकाने कामगाराला काढावयाचे आणि कामगाराने कोर्टात जायचे. यासाठी त्याने पैसा कोठून आणायचा, कज्ज्याच्या काळात खायचे काय, करायचे काय? जमीनदाराने कुळाला हुसकावून लावायचे आणि कुळाने कोर्टात जायचे. थोडक्यात म्हणजे प्रत्येक प्रकरणी न्याय—अन्याय ठरविण्याचा मक्ता मालदार लोकांनी घेतला होता व त्या कामी सरकारी यंत्रणेचा वापर हत्यार म्हणून होत होता.

आघाडी सरकार म्हणते हे चूक आहे. दीर्घसूत्री व खर्चिक न्यायदानाकडे बोट दाखवून तो निकाल होईपर्यंत मालदारांनी जनतेवर अन्याय करीत राहावयाचे हे

आता बस्स झाले. आम्ही निर्णय घेऊ. जनता आपले हक्क बजावील. मालदारांनी वाटल्यास कोर्टात दाद मागावी. कायदा व सुव्यवस्था भंग होण्याचा प्रश्नच येथे उद्‌भवत नाही. जर यात काही होत असेल तर हे की प्रत्यक्ष कोर्टातील न्यायापूर्वी मालदार-सरकार हे जो एकतर्फी न्याय (वा अन्यायच) करीत असत तो त्यांचा 'खास' हक्क बंद पाडला गेला आहे.

'कायदा व सुव्यवस्था' या मंत्राविषयी एवढ्या विस्ताराने लिहिण्याचे कारण तसेच महत्त्वाचे आहे. आज देशभर मालदार मंडळी हाच खेळ खेळत आहेत.

आमचे शांतिप्रिय काँग्रेस सरकार या काव्याला बळी पडत आहे. 'कायदा व सुव्यवस्था' ही मालदारांची बटिक आहे असाच मामला बंगालखेरीज इतरत्र चालू आहे.

बंगालपुरती ही चौकट आघाडी सरकारने मोडली आहे. तिचे फायदे ज्या वर्गास आजवर मिळते होते तो वर्ग व त्याचे दलाल बंगालमधील कायदा व सुव्यवस्था यांच्या नावाने गळा काढीत आहेत हे स्वाभाविकच होय. आघाडी सरकारचे हे तंत्र अगदी नवीन आहे, तर्कशुद्ध आहे आणि सर्व देशभर लवकरच 'कायदा आणि सुव्यवस्था' यासंबंधी हीच भूमिका रूढ होईल यात शंका नाही. यामधून एक निराळाच धोका उद्‌भवत आहे–त्यासंबंधी पुढे अधिक विचार करू.

पक्ष म्हणून सी. पी. एम. चा विचार करता असे दिसून येईल की १९६३–६४ सालची या पक्षाची भूमिका व आताची भूमिका यांत महदंतर आहे. भारतीय राजकारणाचा एक हास्यास्पद विशेष असा की एखाद्या पक्षाला एखादे लेबल लावले की, ते कायमचे होते. जसे जनसंघ जातीय, कम्युनिस्ट राष्ट्रद्रोही वगैरे! काँग्रेसने मात्र फार चलाखीने कोठलेच लेबल पक्के लावून घेतले नाही.

चीनच्या आक्रमणानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षात मोठा पेचप्रसंग उभा राहिला. सर्वसाधारण समजूत आहे त्याप्रमाणे हा पेच चीनला आक्रमक म्हणावे किंवा नाही यासंबंधी नव्हता. पेच असा होता की चिनी आक्रमणाचा फायदा घेऊन जे नेते कम्युनिस्ट पक्षाची मूलभूत डावी व क्रांतिकारी भूमिका बदलू पाहत आहेत (होते!) त्यांना वठणीवर कसे आणावयाचे? चिनी आक्रमण आणि कम्युनिस्ट तत्त्वज्ञान या दोन गोष्टी भिन्न आहेत हे शाळकरी पोरही सांगेल. पण जे शाळकरी समजू शकतो ते टाळकरी समजू शकत नाहीत, आणि आपल्या राजकारणात टाळकरी संप्रदाय फार प्रबळ आहे. एका ऐतिहासिक अपघाताचा पक्षाच्या भूमिकेवर विपरित परिणाम होणार हे त्या वेळेस ज्यांनी ओळखले व यास ज्यांची तयारी नव्हती ते कम्युनिस्ट पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी सी. पी. एम. ची स्थापना केली.

ज्याप्रमाणे जागतिक शीतयुद्धाच्या सर्वसमावेशक पार्श्वभूमीमुळे आजवर प्रत्येक राष्ट्र प्रो-अमेरिका वा प्रो-रशिया होते, त्याचप्रमाणे सी. पी. एम. वर प्रो–चायनाचे लेबल घट्ट बसविण्यात आले. खऱ्याखुऱ्या क्रांतिवादी व गतिमान प्रेरणांना नामोहरम

करण्याचे ते एक कुटिल कारस्थान होते.

मध्यंतरीच्या काळात हावऱ्या खालून बरेच पाणी वाहून गेले आहे. उजवे कम्युनिस्ट आणि अतिडावे नक्षलवादी यांच्या संदर्भात सी. पी. एम. हा पक्ष आता डाव्यांमधील मध्यममार्गी म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. ही प्रक्रिया ओळखून सी पी. एम.चे प्रमुख नेते आपली मध्यममार्गी प्रतिमा आता अधिक स्पष्ट करू पाहत आहेत.

जागतिक साम्यवादी चळवळीचा मागोवा घेणारांना हे ठाऊक आहेच की सोव्हिएट रशिया आता हिंदुस्थानात उजव्या कम्युनिस्टांपेक्षा सी. पी. एम. कडे अधिक आस्थेने पाहू लागला आहे. याचे कारण असे की खुद्द रशियाला आपले इमेज डाव्यांमधील मध्यममार्गी असेच असावे असे वाटते. सी. पी. एम. चीनवादी आहे असे म्हणणारांना राजकारण समजत नाही असे म्हणणे प्राप्त आहे.

यदृच्छया प्राप्त झालेल्या या मध्यममार्गी भूमिकेचा सी. पी. एम. च्या ध्येय–धोरणांवर बराच परिणाम झाला आहे. संसदीय लोकशाहीच्या चौकटीत राहून, सरकारी यंत्रणा मनाप्रमाणे वाकवून, शासनाच्या कल्पनांना नवीन अर्थ देऊन, आपण आपले ध्येयधोरण अमलात आणू शकतो हे सी. पी. एम. ला कळून चुकले आहे आणि म्हणूनच आपली मध्यममार्गी भूमिका सी. पी. एम. सोडण्यास तयार नाही.

मध्यममार्गीत्वाचे काही फायदे असतात–जे फायदे आजवर काँग्रेसने पुरेपूर उचलले. कोठल्याच राजकीय तत्त्वज्ञानाला बांधून न घेता काँग्रेसने विरोधी पक्षीयांकडून नवनवीन विचार उचलले व त्यांची स्वतंत्र प्रतिमा उभी होऊच दिली नाही. त्याचप्रमाणे कट्टर डावे व कट्टर उजवे यांना काँग्रेस नेहमीच हास्यास्पद ठरवू शकली. डाव्या-उजव्या रस्सीखेचीमुळे काँग्रेस असा आभास निर्माण करू शकली की हा फार गतिमान पक्ष आहे. मध्यममार्गीत्व हा भारतीय मनाचा स्थायीभाव आहे. म्हणून राष्ट्रीय मनावर काँग्रेसचे अव्याहत प्रभुत्व राहू शकले.

१९६७ साली चित्र जरा बदलले. उजवे व डावे यांमधून पर्याय निवडण्याऐवजी जनतेने प्रामुख्याने डाव्यांमधूनच आपले राज्यकर्ते निवडले. त्यामुळे काँग्रेसची मध्यममार्गी प्रतिमा नव्या संदर्भात एकदम प्रतिगामी वाटू लागली. या भरीला गेल्या वीस वर्षांतील काँग्रेसची नालायकी जनतेपुढे होतीच. त्यामुळे काँग्रेस ही प्रातिनिधिक प्रेरणा म्हणून नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

ही पोकळी भरून काढावयाची तर डाव्यामधीलच पण मध्यममार्गी असे नवे नेतृत्व पुढे यावयास पाहिजे, हे उघड आहे. सी. पी. एम. चे हे निसर्गदत्त कार्य आहे. सी. पी. एस. च्या नेत्यांनी हे ओळखले आहे. हे त्यांचे खास वैशिष्टच !

मी कलकत्त्याला सुमारे पंचवीस सी. पी. एम. पुढारी–कार्यकर्ते–यांच्याशी बोललो. त्यांना वाटेल तसे क्रॉस केले. मुद्दामच वेडेवाकडे आरोप केले. एक मुलाखत जरा विस्ताराने देण्यासारखी आहे. त्याचे असे झाले–

कलकत्ता सोडण्याच्या दिवशी सकाळी मी ' लेक प्लेस ' (रवींद्र सरोवरापासून अगदी जवळ हे ठिकाण आहे.) येथे गेलो. सकाळी अकराच्या सुमारास त्यांच्या पॉलिट ब्यूरोच्या ऑफिसात पोहोचलो. ही बिल्डिंग जवळपास एखाद्या होस्टेलसारखी आहे. निरनिराळ्या खोल्यांतून तेथे अनेक प्रांतातील सी. पी. एम. कार्यकर्ते राहतात. मी गेलो तेव्हा तेथे आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, केरळ येथील कार्यकर्ते होते. माझे तेथे चांगले स्वागत झाले.

'पीपल्स डेमॉक्रसी ' चे काम पाहणारे कॉमरेड रामदास (— मेनन. बंगालमध्ये काम करायचे म्हणून ' मेनन ' यांनी गाळून टाकले. जसे मी माझे आडनाव कलकत्त्यात असताना ' उडविले ' होते.) यांच्याशी मी तीन तास चर्चा केली. त्यांचा हा मोठेपणा की मी अनेक प्रश्न मुद्दाम वाकडे विचारीत असतानादेखील ते एवढा वेळ माझ्याशी बोलले.

मला येथे मुद्दाम नमूद करावयाचे आहे की कम्युनिस्ट हे दहशतवादी, जाळपोळ-लुटालुटीवर विश्वास ठेवणारे, राष्ट्रद्रोही व असहिष्णू असा जो प्रचार चालतो तो एकतर्फी आहे. मला भेटलेला प्रत्येक कम्युनिस्ट हा वेल–मॅनर्ड, सोशिक, मानवी भावना दर्शविणारा, हसणारा, जोक्स करणारा आणि अतिथ्यशील होता. दहशतवाद वगैरे आपल्या महाराष्ट्रात मात्र दिसतो.

येथेच दुसरी एक गोष्ट स्पष्ट करून टाकतो. कम्युनिस्ट राजवटीत स्वातंत्र्याची गळचेपी होते, सरोवर प्रकरण त्यांनी दंडेलीने दाबून टाकले वगैरे प्रचार हास्यास्पद आहे. कलकत्त्यात असताना रोज माझा रिवाज असा होता की, जो बुकस्टॉल दिसेल तेथे काही वेळ थांबावयाचे आणि नवीन काही दिसले तर विकत घ्यावयाचे. अशा प्रकारे मी शेकडो नियतकालिके, पत्रके, निवेदने, पुस्तके पैदा केली आहेत. बंगालमध्ये मुद्रणस्वातंत्र्याची पराकाष्ठा आहे एवढे मी सांगतो. जिज्ञासूंनी माझ्या जवळची प्रकाशने, मी ' माणूस ' कार्यालयाच्या स्वाधीन करणार आहे, तेव्हा ती जरूर पाहावीत. खुद्द ज्योति बसू यांना ' रशियन साम्राज्यवादाचे कुत्रे ' एवढी शिवी हासडण्याचे स्वातंत्र्य कलकत्त्यात आज आहे. आपल्या महाराष्ट्रातील कोणाही निर्भीड पत्रकाराने सत्ताधाऱ्यांना या धर्तीने संबोधून पहावे !

कॉमरेड रामदासबद्दल मला एक गोष्ट जाणवली ती ही की त्यांचा साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या अंतिम विजयावर पराकाष्ठेचा विश्वास आहे. सी. पी. एम् चे पार्टी वर्क कसे चालते याची माहिती घेतल्यावर मी त्यांना जे काही प्रश्न विचारले त्याची झलक खाली देतो —

प्रश्न : उत्पादनाची साधने राष्ट्राच्या मालकीची करावयाची, ही तुमची भूमिका असताना अतिरिक्त जमीन शेतकऱ्यांना का दिली ? ही नवी प्रोप्रायटरशिप कशाला ?

उत्तर : चंद्रशेखर, तुमचा रोख माझ्या लक्षात आला. आम्ही पुढे केव्हातरी या

जमिनीचे राष्ट्रियीकरण करू.

प्रश्न : आताच का करीत नाही ?

उत्तर : आमची राजवट केवळ दोन राज्यात आहे. म्हणून असे धोरण डिस्क्रिमिनेशनचे होईल. सर्व देशात जेव्हा साम्यवादी राजवट येईल तेव्हा याचा विचार होईल.

प्रश्न : रामदास, तुमच्या या धोरणाने भारतात साम्यवाद कधीतरी येईल असे तुम्हास वाटते ?

उत्तर : जरूर येईल ! अहो, आज गरीब खेडुतांना एकदम साम्यवाद 'लागू' करायचा आणि भांडवलदारांना मोकाट सोडावयाचे असे कसे करता येईल ?

प्रश्न : बंगालमध्ये बहुतेक औद्योगिक कामगार बिगरबंगाली आहेत. साम्यवादाचा ह्या मुख्य आधार आहे. याला सांभाळण्यात बंगाली राष्ट्रवादाची अडचण येणार नाही काय ?

उत्तर : बंगाली राष्ट्रवाद म्हणजे काय ?

प्रश्न : रामदास, तुम्ही एवढे भोळे असाल असे मी मानीत नाही. अहो, तुमच्या सर्व धोरणांनी बिगरबंगाली जनतेचा फायदा होत आहे व बंगाली मध्यमवर्ग बेकार राहून भरडला जात आहे. याचा स्फोट केव्हातरी होणारच !

उत्तर : ह्या सर्व प्रश्न आर्थिक विकासाचा आहे. रक्कम उभारणीशिवाय काही होणार नाही.

प्रश्न : साम्यवादी चळवळ रक्कम उभारणीच्या कामी अडथळे का आणीत आहे ?

उत्तर : हे पाहा, जोपर्यंत अर्थव्यवस्था भाडवलदारांच्या ताब्यात आहे तोवर रक्कम उभारणी म्हणजे त्यांचे नफे फुगविणे हेच होय. आम्ही हे होऊ देणार नाही.

प्रश्न : क्रांती झाल्याखेरीज भांडवलदार संपणार नाही. म्हणून रक्कम उभारणीत अडथळे आणून असंतोष भडकावण्याचे धोरण आहे काय ? पण या भानगडीत भांडवलही नष्ट होईल.

उत्तर : तसे म्हणा – ही सिस्टिम अंतर्विरोधाने पोखरलेली आहे. साम्यवाद हीच एक प्रणाली अंती आपल्याला तारील. ती आणण्यासाठी आम्ही बांधील आहोत. संसदेत राहून अथवा जरूर पडल्यास संसदेच्या बाहेर आमचे सर्व प्रयत्न चालू राहणार !

प्रश्न : रामदास, साम्यवाद ही प्रणाली तरी अंतर्गत सुसंगतियुक्त आहे काय ? व्यक्तीला नालायक ठरवता आणि अखेरीस सारे राज्ययंत्र एकदोन व्यक्तींच्या हातीच सोपविता – ह्या साम्यवादी अंतर्विरोध नाही काय ?

उत्तर : आमची सामुदायिक नेतृत्वावर श्रद्धा आहे !

असो ! रामदासचा सोशिकपणा दाखविण्यापुरता ह्या मासला पुरेसा आहे.

**दहा दिवस कलकत्ता हिंडून आणि तासन्तास चर्चा करून मी अशा निष्कर्षाप्रत आलो आहे की, बंगालमध्ये साम्यवादाला काही भवितव्य नाही.**

अनेकांना हा निष्कर्ष धक्कादायक वाटेल. माझे साम्यवादी मित्र नाराज होतील. पण नाइलाज आहे. रामदास वगैरेंच्या निष्ठांबद्दल मला अपरंपार कौतुक आहे—मी स्वतः कशावरच निष्ठा ठेवू शकत नाही म्हणूनही असेल कदाचित ! पण मानवी अस्तित्वाची सर्वांत क्रूर शोकांतिका ही की, निष्ठा ही नेहमी स्वतःची वैरीण होत असते. स्वतःचेच आतडे स्वतः चघळणाऱ्या, उजेडाला बावरणाऱ्या आणि स्वतः-खेरीज काहीच न ओळखणाऱ्या नरमासारखी, निष्ठा ही चीज आहे !

साम्यवादी निष्ठाही याला अपवाद नाही. ही मंडळी विलक्षण जखडलेली आहेत. तुम्ही कितीही डिवचा—त्यांच्या मानसिक गुहेतून ही बाहेरच येत नाहीत. त्यांना उजेड सहन होत नाही. त्यांचे कम्युनिकेशन तुटले आहे. स्वतःशीच बोलणे आणि स्वतःच्या विचाराच्या माणसाशी बोलणे यांत फरक तो काय ? दुसऱ्याशी, दुसऱ्या विचाराशी ही मंडळी संपर्कच येऊ देत नाहीत. त्यामुळे ह्यांच्या अस्तित्वाचे वर्तुळ मर्यादित होत होत एखाद्या निरुपयोगी मठाचे स्वरूप या चळवळीस येणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे !

ही झाली सर्वसाधारण मर्यादा. बंगालची खास वैशिष्ट्ये निराळीच आहेत. तेथे साम्यवादाच्या लेबलाखाली आणखी काहीही येऊ शकेल पण मार्क्सप्रणित साम्य-वाद—जो कोणाही राष्ट्राला बांधलेला नाही—अवघे विश्वचि दुज्याचे घर आहे—




जो आकाशपुत्र समीर आहे – त्याला बंगालमध्ये काही भवितव्य नाही.

बंगाली माणसाला वारा सहन होत नाही. बंगालीपणाची शाल तो घट्ट लपेटून घेतो. साम्यवादाची वैश्विक ओढ कळण्याची बंगालजवळ मानसिक कुवत नाही. याचे मूलभूत कारण असे की, बंगाल प्रथम आणि अखेर बंगाल आहे – जेथे 'भारतीय साम्राज्यवाद' वगैरे शब्द वापरले जातात.

प्रांतीयतेचा विषय निघाला की, प्रत्येक बंगाली चवताळून उठतो. आम्ही इतर प्रांतांपेक्षा निराळे आहोत, हे तो बजावतो. या त्याच्या बजावण्यातच प्रांतीयतेचा उच्चांक आहे हे तो सोयीस्करपणे विसरून जातो.

'बंगाली प्रांतीयता' हा शब्द चुकीचाच आहे. यथार्थ शब्द प्रयोग म्हणजे 'बंगाली राष्ट्रवाद!' या बंगाली राष्ट्रवादाला जे जे पोषक ठरले ते ते बंगाल आत्मसात करतो. सध्या साम्यवाद या कामी उपयोगी पडत आहे. साम्यवादाकडे बंगाल केवळ राष्ट्रापासून अलग राहण्याचे वैचारिक साधन म्हणूनच पाहतो.

साम्यवादी चळवळीची शोकांतिका ही की आंतरराष्ट्रीय आविर्भावाने निघालेली ही चळवळ ठिकठिकाणच्या राष्ट्रवादांशी, धर्मश्रद्धांशी आणि अनेक मूर्ख कल्पनांशी जुळवून घेऊनच प्रबल होते आहे. या प्रक्रियेत मार्क्सप्रणीत साम्यवाद नामशेष झाला आहे.

सी. पी. एम. ला मिळालेली लोकप्रियता व साम्यवाद यांचा काडीचाही संबंध नाही. कॉंग्रेसविषयीचा तिटकारा, मुस्लिम जनतेचा पद्धतशीर अनुनय व बंगाली राष्ट्रवादाला प्रच्छन्न आवाहन या त्रयींच्या साहाय्याने सी. पी. एम. सत्तारूढ झाली आहे. नक्षलवादी हे विसरतात की बंगालला परकी वर्चस्वाचे 'अती वावडे' आहे. जे लोक भारताला निराळे साम्राज्यवादी राष्ट्र मानतात ते चीनच्या ओंजळीने पाणी पितील हे मानणे केवढा मूर्खपणा! नक्षलवादाची प्रो–पेकिंग भूमिका ही त्याची वैरीण ठरणार आहे.

कोणी म्हणेल 'शतरंज'मधील चीनविरोधी दृश्यांबाबत कलकत्त्यात प्रात्यक्षिके होतात हे कसे? ही सर्व प्रतिक्रिया भारतापासून आपला वेगळेपणा दाखविण्यापुरती आहे. एक बंडखोरी यापेक्षा बंगालच्या लेखी तिला अर्थ नाही. नक्षलवादी आणि त्यांचे विरोधक एकच चूक करीत आहेत ही गोष्ट मनोरंजक आहे. 'नक्षलवाद' हा अश्रितवाद आहे–बंगाल कधीही हे मान्य करणार नाही. ऑर्किडचे त्याला आकर्षण आहे, पण केवळ खेळणे म्हणून!

साम्यवादी समीर एकीकडे बेभानपणे दिशाहीन घोंघावत असताना नक्षलवादी सिकता विलक्षण तापून उपद्रवी बनण्याचा प्रयत्न करीत आहे. बंगाली सलील हे सर्व चाळे शांतपणे पाहत आहे. सिकता तापू शकेल, पण तिला स्वतःचे व्यक्तिमत्त्व नाही. सलिलाने जाता जाता केलेला तो एक खेळ आहे.

[ क्रमशः ]

महादेव मोरे

# कसांवट

पहिल्या भेटीतच ती म्हणालेली असते--तुला काही समजतच नाही बघ !

वयाने तिच्या दुप्पट तो, पण तिच्या अशा बोलण्याने त्याच्या आयुष्यावर चढलेली कितीतरी वर्षे गळून पडतात. त्याची देहयष्टीही तशीच असते. वय लपविणारी...तिच्या बोलण्याचे मग त्याला हसू येते; आणि ती निघून गेली तरी केवळ तेच लक्षात राहते--तुला काही समजतच नाही बघ !

समजत नाही ? कशाबद्दल ? कुणाबद्दल ? नि काय ? प्रश्नांच्या गुदगुल्या... हसू...आनंदही...अन मग लयांचीच रुंजी...

दिवस भरभर उलटत असतात अन् ही झिरमिरती ओळख दाट होत असते... एकदा दुपारचा तो बाकावर झोपलेला असतो आणि ती येते, म्हणते-" बघ बरं, माझे कपडे किती मळलेले आहेत ? मी ही अशीच राहू का ? साबणाला पैसे तरी दे, धुवून आणते ! "

तिने असा आपणावर हक्क दाखवावा...? त्याला फार फार बरे वाटते. समाधान आतल्याआत झिरपत, पसरत राहतं...अशाच तिने आपल्या गरजा सांगत राहाव्यात नि त्या आपण पुऱ्या करीत राहाव्यात...हे किती सुखाचे...हे असेच चालावे... चालत राहावे.

मध्ये एकदा तिच्या ट्रंकेची किल्ली हरवते आणि ती कुलूप काढायला बोलवायला येते. तो जातो. घरी ती एकटीच. कुलूप काढून परतताना झटकन् तो तिला मिठीत घेतो अन् मग ओठावर ओठ कसे नि केव्हा टेकतात--समजतच नाही...परतला तरी. किती तरी वेळ ती चुंबनाची गुंगी असते ! रोमांचाची फुले--साऱ्या देहभर उठणारी, विरणारी...

वास्तविक, असे होता नये...ज्याची विवाहपूर्व आयुष्यात दोन प्रेम प्रकरणे झाली आहेत, एका स्त्रीबरोबर सात-आठ वर्षे जो सुखाचा संसार करतो आहे आणि जो दोन मुलांचा बाप आहे, त्याने तरी असे हरवून जाता नये. ऐन तिशीचे हे वय, ह्या वयात, असे काही घडले तरी, जमिनीवरचे पाय सुटता नयेत. पण आजच...? आताच...? असे काय...काय होतेय् हे? तो विचार करीत असतो, अन् विचार करीतच राहतो...

...आणि केव्हा स्वप्नातही आले नसते, नव्हते; ते घडते. तो एक पत्र लिहितो—तिच्याबद्दलची ओढ, तळमळ, प्रेम वगैरे...तिच्याकडूनही लगेच उत्तर येते...अन् मग हे असंच चालू राहतं.

अशाने दोघे आणखी जवळ येतात. कितीतरी जवळ येतात...

तो विवाहित, संसारी—तिला हे माहितही असते. त्यालाही जाणवते पण ओढ काही कमी होत नसते.

तिच्यावरून तो आपल्या पत्नीला वेळोवेळी चिडवीत—डिवचीत असतो. ती बिचारी आणि भोळीही. तिला सारी चेष्टाच वाटते. पण एके दिवशी तिचे पत्र हाती लागताच ती मुसमुसू लागते. म्हणते, तुम्ही असे असालसे वाटले नव्हते! मला सारे खोटेच वाटले होते पण...पण तुम्ही...आणि असेच बरेच.

नि मग तो तिची समजूत काढू लागतो...विवाहापूर्वीच्या आयुष्यातील 'ती' त्याला आठवू लागते. तिचे व हिचे नाव एकच असणे हा किती चमत्कारिक योगायोग आहे, ते तो तिला पटवू लागतो अन् दिलासा देण्याच्या आवाजात सांगू लागतो—तुझ्या—माझ्या प्रेमाला बाध येईल असे कुठलेही कृत्य माझ्या हातून घडलेले नाही, घडणार नाही. विश्वास बाळग, तू ह्या गोष्टीचा...हास पाहू, राग आला नाही ना तुला? मग हास ना!

आणि ती मग खुदकन् हासते...पुन्हा आकाश निरभ्र व्हावे—तसेच काहीसे वाटू लागते...मग रोजचीच सवय—लहर फिरेल तेव्हा तिचा ठरलेला प्रश्न—

"काय म्हणते तुमची 'ती'?"

अशावेळी पती-पत्नीचे ते परंपरागत नाते कुठल्या कुठे लोपते, आणि एखाद्या जिवलग दोस्ताला मनातली एक—एक गोष्ट सांगत राहावी, तसे मग तो सांगत राहतो—आज ती असे म्हणाली, आज मी अमुक केले, त्यावर मग तिने...वगैरे.

हे सांगत असताना आपल्या आत सुखाचे कसे जिव्हाळे जन्मत असतात! त्यात चिंब भिजत, लोळत तो सांगतच राहतो—तिचे आई बाप दूर तिकडे आहेत—सौंदत्तीला. ती इथेआजोळी राहते. इथल्यांची ती लाडकी. लहानपणापासून इथेच रुळलेली. तिथल्याप्रमाणे इथेही गरिबीच आहे बघ! तिला शाळेच्या फीलाही वेळच्या वेळी पैसे मिळत नाहीत. एकदा अशीच शाळेला जायची बंद झाली. मी विचारल्यावर तिने सारे सांगितले; आणि मी पैसे देताच परत ती शाळेला...



तिच्या गरिबीचे एक गिरमीट बनते, त्याच्या डोकीत फिरत–गिरत राहते. तो स्वाभाविकपणे त्रस्त होतो, अस्वस्थही ! त्याला हेही माहीत असते, तिला दोन वेळ पोटभर धड जेवणही मिळत नाही...तरीही...तरीही ती किती आनंदात असते !

इतक्या लहान वयांत स्वतःला हे असे शिकविणे, शिकवायला लागणे किती अवघड !

त्याला कौतुकच वाटते आणि आपल्या घरी सुग्रास अन्न खात असताना त्याला केवळ हेच आठवत राहते–आपण हे इतके चांगलेचुंगले खातो आणि तिला... ?– अन् मग त्याच्या तोंडातील घास तोंडातच फिरत राहतो.

आणि अशाच एका चुकार क्षणी त्याला आठवते–एकदा घरी ती अशीच माच्या-वर बसलेली असते. नि तो जवळ येताच ती लाजून लालबुंद होते अन् आपल्या दोन्ही गुडघ्यात तोंड खुपसून बसते. आपण पत्रातून पुन्हा एका चुंबनाची मागणी केली होती, ती तिला आठवली का ? ती लालजर्द गुलमोहराची डहाळी तशीच वर उचलून तिचे धुमसणे शोषून घेता आले असते. पण–पण त्यावेळी ती किती आणि कितीतरी लहानखुरी, एवढी–एवढीशी वाटली ! आपल्या मनातील चुंबनाची आसक्ती विझून आपण वात्सल्याने तिच्या डोईवरील रेशमांत थोपटल्यासारखे करून कसे व केव्हा बाहेर पडलो–हे त्याला समजलेलेच नसते...

मग तर त्याचे त्यालाच समजेनासे होते–तिच्याबद्दल नेमके आपणांस काय वाटते,

आसक्ती ? वासना ? प्रेम ? वात्सल्य ? की याहीपेक्षा अनामिकसे काही...? मनात सतत तिच्याबद्दलचेच विचार भिरभिरत राहतात...झोप लागली तरी स्वप्नात तीच; आणि जाग आल्यावर परत तिच्याच विचारांचा ससेमिरा...त्रास...ताप...वैताग... आपल्यासारख्याला असे वागणे शोभत नाही. ती अजाण आहे, अल्लड आहे; तिचे अजून लग्न वगैरे व्हायचे आहे अन् अशामध्ये आपले असे हे वागणे...हे सारे समजत असते पण ओढ काही कमी होत नसते.

अन् एकदा तो तिला विचारतोच–तू मला हवी आहेस ग, पुरी न् सगळी ! तुझे. तुझ्या देहाचे मला वेड लागलंय्...फक्त एकदाच नि एकच वेळ...

–असे बोलू नको, माझ्या राजा; माझ्या प्रेमाचा अपमान करायचा आहे का तुला ? आणि ती त्याचा हात हातांत घेऊन किंचित् दाबते–हट्टी माणसाची समजूत काढावी, तसे; अन् मग निघून जाते.

तो मात्र जागेलाच खिळलेला–खिळा ठोकल्यासारखा...मोहाच्या या क्षणालासुद्धा तिने किती सहजपणे बगल दिलेली असते आणि स्वतःप्रमाणे आपणालाही सावरलेले अन् बरेच शिकविलेले असते ! तिच्या या वेगळचा-आगळचा दर्शनाने तो स्तिमित होऊन जातो...मनात येते, ह्या साऱ्यांचा शेवट तरी काय मग ? विवाह्-बाह्य अशा ओळखी–परिचयापासून पलंगापर्यंत प्रवास करणाऱ्या नि मग तीच एक वाट मळवीत राहणाऱ्या...जगात हे असेच घडते, घडणे अटळ अन् स्वाभाविकही असते...स्त्री-पुरुषांमध्ये निखळ प्रेम, मैत्री राहणे इतके कठीण असते ? का तशी ती राहू शकतच नाही ?

दिवस कसे भरभर उलटत असतात...जणू मध्ये काही घडलेले नसतेच, कुणा एकाचा तोल गेलेलाच नसतो नि कुणी एकाने सावरलेलेच नसते ! – अनपेक्षित पडलेला तडा असा किती सहजपणे सांधला गेलेला असतो !

दिवस असे नि कसे सरत–संपत असतात, समजतच नसते. आयुष्यात आपण फार दुःख व फार कष्ट सोसले, पचविले; म्हणूनच का हे असे मंतरलेले, सुगंधी दिवस आपल्या वाटचाला येताहेत...घरी पत्नीचे सुख, बाहेर प्रेयसीचा सहवास...

आणि अशीच तिची परीक्षा संपते. सुटी पडते; अन् मग अशाच एका कातरवेळेस ती भेटायला येते. त्याला नजरेत साठवून घेत क्षणभर ती त्याच्याकडे पाहत राहते नि मग मुके क्षण बोलके होतात–

– उद्या मी जाणार आहे...

– कोणत्या गांवी... ?

– माझ्या आईच्या. दुपारीच वडील आलेत् बोलावून नेण्याला...

– सुटी संपेपर्यंत तेथेच राहणार का !

– सुटी संपल्यानंतरही तेथेच राहावं लागणार... वयात आलेली मुलगी आपल्या नजरेसमोर राहावी, असं त्यांना वाटणं स्वाभाविक आहे...

— तुझी इच्छा काय आहे ?

— माझ्या इच्छेचा इथे प्रश्नच येत नाही. त्यांच्या इच्छेप्रमाणे वागणे, हे कर्तव्य मानले पाहिजे, नाही का ? — आणि ती उसासून म्हणते— तिकडे जाणार, तिकडेच राहाणार अन् अशामध्ये कुणाशीतरी लग्न वगैरेही होऊन जाईल, पुन्हा आयुष्यात भेट होईल न होईल...पण...पण मी तुझे काही देणे लागते... ते देणे... ते देणं जाण्यापूर्वी फेडावे...

— देणे ? आणि कसले बुवा ?

— मध्ये एकदा तू म्हणाला होतास, तू मला हवी आहेस—फक्त एकदाच, पुरी अन् सगळी...आज मी आले आहे, तुझ्याकरिता, तुझ्याचसाठी.

— वेडे, माझ्या गळ्याभोवतालचे तुझे हे रेशमी पाश काढ... माझ्या संयमाला असे जखडू नकोस ग... माझ्यामधील वासनेला निखळ प्रेम करावयास तूच शिकविलेस... ते गढूळ व्हावे असे तुला वाटते का ? हा डाग...नि त्याची टोचणी... जन्मभर हेच वागवत राहावे का मी ? कुणा एकीने आपणांस हे असे वेगळे प्रेम करायला शिकविले व त्याच्या मर्यादा न ओलांडता आपणही ते केले—हे समाधान तरी निदान...

हे सारेच बोलणे किती नाटकी असते; यामुळे असेल, ते खोटे नसते तरी किती खोटे-खोटे वाटू लागते आणि मग शेवटही असाच होतो—निरोप घेताना ती त्याचे उसासून चुंबन घेते आणि मग पाठ फिरवून निघून जाते...तो तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बराच वेळ पाहत राहतो. त्याच्या नजरेसमोर तिचे ते काळेभोर सुंदर डोळे उभे राहातात-पाठ फिरवून निघून जाताना अश्रूंनी ओथंबलेले, डबडबून आलेले. अन् त्याक्षणी, त्या क्षणापुरते वाटू लागते-साऱ्या सृष्टीचाच रंग फिका पडला आहे...

आणि मग घरी आल्यावर नेहमीच्या सवयीनुसार पत्नी विचारते, "काय म्हणते तुमची 'ती ?'

तसा मग तो झालेले सारे काही घडाघडा सांगू लागतो...मन हलके-हलके झाल्याप्रमाणे वाटू लागते...त्याचे सांत्वन केल्याप्रमाणे तिची लांबोडकी बोटे त्याच्या केसातून फिरत राहतात. मग म्हणते,

— तुम्हांला काही समजतच नाही बघा !

⌑ ⌑



“मी आघाडीची सूत्रे हाती घेण्यापूर्वीच काही योजना आखल्या गेल्या होत्या,’ हे जनरल कौल याचे म्हणणे मेजर जोहरी यांनी धुळीला मिळवलंय. आपल्या ‘Chinese Invasion of NEFA’ या पुस्तकात मेजर एस्. आर. जोहरी लिहितात, “४ थ्या कोअरचे कमांडर ता. ६ ऑक्टोबरला आघाडीवर आले. ता. ६ ऑक्टोबर ते ता. ११ ऑक्टोबरपर्यंत ते तिथेच राहिले. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांबरोबर त्यांनी अनेकदा बोलणी केली. साहजिकच चीन आणि भारत यांच्या संभाव्य युद्धजन्य परिस्थितीवर त्यांची स्वतःची अशी काही मते बनली असणारच. आघाडीवरची प्रत्यक्ष कोअर कमांडरची उपस्थिती हेच सिद्ध करीत होती की, त्यांच्या ब्रिगेडने आपले उद्दिष्ट साध्य करण्याकरिता आखलेल्या योजना त्यांना पसंत आहेत. तिथे घडत असलेल्या ऐतिहासिक घडामोडींकडे जनरल कौलसारखा वजनदार आणि कुवत असलेला माणूस एक प्रेक्षक या नात्याने इतक्या दुरून पाहत बसला असेल, यावर कुणाचाही विश्वास बसणे शक्य नाही; आणि म्हणूनच आगामी युद्धात सांगले या ठिकाणी आपण प्रथम लक्ष केंद्रित करून तिथे भक्कम पाय रोवले पाहिजेत, ही कल्पना ब्रिगेड कमांडरची एकटयाची असणे शक्य नाही. आपापल्या जबाबदारीच्या आणि मगदुराच्या प्रमाणात तिथे हजर असलेल्या प्रत्येक वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याचा या निर्णयापर्यंत येऊन पोहचण्यात हात होता. ऑक्टोबर १९६२ च्या पहिल्या आठवडयातच जनरल कौल यांची तिथली उपस्थिती त्यांना हे कबूल करायला भाग पाडील की, चिन्यांवर हल्ला करून त्यांना हुसकून देण्याच्या नियोजित कार्यक्रमाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती. ही योजना जर का त्यांना पसंत नसती तर त्या योजनेची अंमलबजावणी तावडतोब थांबवणे हे त्यांच्या हातात होते. किती झाले तरी ते कोअर

लेखक : ब्रिगेडियर जे. पी. दळवी.

अनुवाद : ॲडव्होकेट माधव कानिटकर

## लेखांक : वीस

कमांडर होते आणि ते म्हणतील ती पूर्वदिशा अशी त्या वेळी परिस्थिती होती. लेफ्टनंट जनरल कौल स्वतःच हे कबूल करतात की, ब्रिगेडियर दळवी यांची योजना मला पसंत होती ! म्हणूनच या योजनेबरोबर ब्रिगेडियर दळवी यांची सांगड घालून त्यांना गोवण्यास आमची हरकत आहे. ज्या क्षणी आघाडीवरचा सर्वोच्च अधिकारी या नात्याने जनरल कौलनी या योजनेस मान्यता दिली, तत्क्षणी ती योजना जनरल कौल यांची झाली. इंडियन आर्मीची झाली !"

स्वतःचा बचाव करण्यासाठी केलेल्या दुबळ्या समर्थनात जनरल कौल यांचा एक दुवा असा आहे, की "काय करणार ? मला फार उशीर झाला होता. ज्या पायदळ तुकड्यांचा पुढे धुव्वा उडाला त्यांच्या हालचाली मी थांबवू शकत नव्हतो."

जनरल कौल, का बरे तुम्हांला हा उशीर झाला ? आपल्या कंपनीचा वायर-लेसने तुमच्याशी सतत संपर्क होता. एका क्षणात तुम्ही त्यांना पुढे जाण्यापासून परावृत्त करून परत बोलवू शकला असतात. अनुचित उत्साहने का होईना, पण आपले जवान परत मागे आले असते. शस्त्रसज्ज शत्रूच्या कोंडाळ्यात मधेच जाऊन बसणे कुणाला आवडेल ?

पूल क्रमांक ४ जवळ असलेली आपली अपुरी तयारी आणि त्यावर केलेली प्रतिकूल टीका ही अशीच असमर्थनीय आणि अन्यायकारक आहे. मला राहून राहून आश्चर्य वाटते की, ज्या टीकेचा परिणाम ब्रिगेड कमांडरपेक्षा त्याच्या हाताखालच्या लोकांवरच जास्त होऊ शकेल अशी टीका जनरल कौलना का करावीशी वाटली ? कारण जनरल प्रसाद आणि मी जनरल कौल यांच्याबरोबरच ता. ७ ऑक्टोबरला नामका–चू च्या परिसरात आलो होतो. ता. ९ ऑक्टोबरला

पूल क्रमांक ४ जवळ एक मेजर चौधरी यांची कंपनी सोडली तर दुसरा कुठलाच बचावाचा पवित्रा असा नव्हता. मेजर चौधरी यांची कंपनी ही त्याच बटालियनचा एक भाग होता, की ज्या बटालियनचे प्रमुख जनरल कौल होते आणि कमांडिंग ऑफिसरदेखील लेफ्टनंट कर्नल मिश्रा होते. पूल क्रमांक १ आणि २ जवळ याच कंपनीने लेफ्टनंट कर्नल मिश्रांच्या नेतृत्वाखाली बचावाचे फारच चांगले पवित्रे घेतले होते. अशा स्थितीत पूल क्रमांक ४ जवळच ही कंपनी बेपर्वाईने कशी राहील ? कंपनी कमांडर तर तोच होता ! जनरल कौल यांना सुचवायचंय तरी काय ?

१९६२ च्या भारत–चीन युद्धात ज्यांनी आपला प्राण गमावला, तो मेजर चौधरी हे एक शूर, उमदा आणि लायक ऑफीसर होते. पहिल्या दर्जाच्या बटालियनच्या एका उत्तम कपनीचे नेतृत्व ते करीत होते. ता. १० ऑक्टोबरला सेंग–जाँग (Tseng–Jong) या ठिकाणी पाठवलेल्या तुकडीचे नेतृत्व त्यांनीच केले होते. तिथे गाजवलेल्या अतुल शौर्याबद्दल त्यांना पुढे खास बक्षीस जाहीर केले गेले. तरुण वयात मरणाला मिठी मारणाऱ्या या उमद्या लष्करी अधिकाऱ्याची बाजू मांडणे हा माझा हक्क आहे. मेजर चौधरींनी पुरेशी हत्यारे आणि दारूगोळा जवळ नसतानादेखील आपल्या जवानांसह त्यांच्यावर सोपवलेली कामगिरी (जी वस्तुतः खऱ्या अर्थाने लष्करी कामगिरी नव्हतीच) पार पाडण्यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा केली, अशी माझी खात्री आहे.

आघाडीवरची एकूण अकार्यक्षमता, नालायकी आणि ढिलाई याचे चित्र रंगविताना जनरल कौलनी अखेरचा म्हणून असा फराटा ओढलाय की, "एक ९/पंजाब ही तुकडी सोडली तर बाकीच्या फारच थोड्या लोकांना रणक्षेत्राचे चांगले ज्ञान होते; कारण हे इतर जवान नुकतेच तिथे आणले गेले होते !"

जनरल कौल, कोण होते हे 'बाकीचे' आणि 'इतर' लोक ? कुठून आले होते ते ? कशाकरिता आले होते ? ९/पंजाब सोडून बाकीच्या कुणाला तिथली माहिती नव्हती, कुणाला होती, हे जरा स्पष्ट सांगाल की नाही ?

असली विधाने करून जनरल कौलना असे सुचवायचे, की, ढोला या ठिकाणी आपली तयारी उत्तम होती–पण तशी ती नव्हती. जनरल कौल यांनी स्वतःच गुरखा आणि रजपूत तुकड्यांना पूल क्रमांक ३ आणि ४ च्या मध्ये आणून ठेवले होते. आणि अशा तऱ्हेच्या मोहिमेची तयारी नसताना त्यांना या नको त्या 'जागा' घ्यावा लागल्या होत्या. सगळेजण जवळ जवळ एकाच वेळी आघाडीवर आले होते. आणि ज्युनियर कमांडर्सवर अशी पाळी आली होती की, त्यांना लढाईच्या तंत्राचा श्रीगणेशादेखील ठाऊक नाही, ह्याचे त्यांना प्रदर्शन करावे लागले. त्यांचे युद्धशास्त्राचे शिक्षण पूर्ण झाले नव्हते, की त्यांना तालीम दिली गेली नव्हती.

संभाव्य लढाईच्या दृष्टीने ज्याने चुकीची ठिकाणे निवडण्यापासून तो चुकीच्या मार्गाने अपूरी तयारी ठेवण्यापर्यंत चुका केल्या होत्या त्या 'नालायक'(!) ब्रिगेड कमांडरला खरे म्हणजे जनरल कौलनी डिस्मिस् करायला हवे होते. खरा सिनीयर कमांडर " ऐन युद्धात या चुका नाइलाजास्तव निदर्शनास आणून देणे मला भाग पडले." असे आडवळणाने बोलत नाही तर आठवणीने असे रोख ठोक सांगतो की, "त्या वेळीदेखील अमूक एक गोष्ट मला पसंत नव्हती!" जनरल कौलना असे वागण्याचा काहीच अधिकार नव्हता हे उघड आहे. ज्यांना शस्त्रास्त्रे पुरवली गेली नाहीत, ज्यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली गेली नाही, ज्यांना लढाईची तयारी करण्यासाठी अवधी दिला गेला नाही आणि शूर जवानांवर १९६२ साली अग्निदिव्यातून जाण्याची ज्यांनी पाळी आणली, त्यांनीच त्या शूरांचे 'कुठं चुकलं' हे ठरवायला बसायचे ही असह्य बाब आहे. जनरल कौल यांना हे धाडस करवत तरी कसं?

आता पुन्हा आघाडीवरचे हवामान त्या वेळी कसे काय होते या विषयाकडे वळू. त्या वेळी आघाडीवर घडत असलेल्या घटनांचा ता. १० ऑक्टोबरला कळस झाला. ता. ८ आणि ९ ऑक्टोबरला जनरल कौल यांनी जनरल प्रसाद, सातव्या पायदळ तुकडीचे कमांडर, तीन कमांडिंग ऑफिसर्स, ब्रिगेड मेजर आणि इतर अनेक अधिकारी यांच्याबरोबर मोहिमेची चर्चा केली. मे १९६२ मध्ये धोला येथे जाऊन चौकी बांधण्याची कामगिरी पार पाडणारे कॅप्टन महावीर प्रसाद यांना या सभेसाठी खास आमंत्रण दिले गेले होते; कारण, थाग-ला प्रदेशात चिनी कुठे कुठे आलेले आहेत, किती प्रदेश त्यांनी व्यापला आहे, याची कॅप्टन महावीर प्रसादना चांगली माहिती होती. कार्यक्षम हेड क्वार्टरच्या अभावीच ह्या 'योजना' आखल्या जात होत्या. आघाडीवरच्या परिस्थितीचा अभ्यास नसतानाच निर्णय घेतले जाणार होते आणि खालच्या दर्जाचे लष्करी अधिकारी ते अमलात आणणार होते. ४ थ्या कोअरच्या हेड क्वार्टरची स्थापना अजून झालेली नव्हती. इथून तिथून कशाही जमवलेल्या जवानांचे जथे मिलिटरी सेक्रेटरीकडून मिळालेली अॅपॉइंटमेंट लेटर्स खिशात घालून तेझपूरकडे रवाना होत होते आणि त्यांना थाग-ला हा प्रदेश आहे तरी कुठे, हे ठाऊक नव्हते. ज्या युद्धात सबंध देशाची मानखंडना होण्याची शक्यता आहे, अशा युद्धाची योजना नकाशांशिवाय, स्टाफशिवाय इतर कुठल्याही व्यवस्थेचे पाठबळ नसताना अशा गोळा करून आणलेल्या कमांडर्सच्या संमेलनात ठरवायची नसते. कमीत कमी एवढे तरी म्हणता येईल की, चोरून मालाची ने–आण करणाऱ्या टोळीच्या म्होरक्यांनी खालच्या आवाजात जमून बोलावे किंवा गनिमी युद्ध करणाऱ्या शिपायांनी गुपचुप अचानक एकत्र जमावे अशा थाटात अधिकाऱ्यांची सभा बोलावणे हे अपूर्व होते. मेजर जोहरींनी तर या सभेचे वर्णन करताना म्हटलंय, "... ही सभा म्हणजे एक अनौपचारिक दरबार होता. इंडियन आर्मी

एक नवा इतिहास घडवीत होती ! " ( Indian Army was making history ! )

ता. ८ ऑक्टोबरचा सबंध दिवस पूल क्रमांक ३ जवळून थागला प्रदेशातल्या उंच उंच शिखरांकडे टक लावून पाहत चिन्यांनी त्यांच्या सैन्याची रचना कशी केलेली आहे हे जनरल कौलना दाखवून देण्यातच गेला. "चिन्यांनी कुठे कुठे मोकळी जागा सोडलेली आहे, त्या ठिकाणी जायचा रस्ता कुठून जातो, " हे प्रश्न जनरल कौल मधे मधेच विचारीत होते. कॅप्टन महावीर प्रसाद हा एकमेव अधिकारी, स्थानिक इंटेलिजन्स ब्यूरोचा प्रतिनिधी आणि धोला पोस्टचा कमांडर यांच्या मदतीने जनरल कौलना माहिती पुरवींत होता. जनरल कौल यांच्या चौकशांचें स्वरूप आम्हाला विचित्रच वाटत होतें. असे असूनदेखील हे विचारण्यात त्यांचा हेतू काय आहे, त्यांचा बेत काय आहे, याचा कुणालाच थांगपत्ता लागत नव्हता. चिन्यांनी मोकळ्या सोडलेल्या निर्जन प्रदेशात आपल्याला जवानांच्या लहान लहान टोळ्या पाठवून ते व्यापता येण्याची कितपत शक्यता आहे, याची त्यांनी चर्चा केली. योजनांचा आणि सूचनांचा हा गोंधळ पाहून आमचा तर धीर सुटत चालला होता. मधेच जनरल कौलनी हिटलरचा शूर सेनापती रोमेल याने शत्रूचे डाव कसे उलटवले होते याच्या गोष्टी सांगून आम्हाला सुखावले ! ... पण आमच्यापैकी कुणी हे लक्षात घेत नव्हता की, फिल्ड मार्शल रोमेलने ज्या प्रकारच्या वाळवंटाच्या प्रदेशात ज्या युक्त्या वापरल्या त्यांचा १४,००० फूट उंचीवर असलेल्या हिमालयातल्या प्रदेशाशी काहीही संबंध नाही ! जनरल कौलनी मधेच त्यांच्या तथाकथित टेहळणी ( ! ) बाबत शब्दांची पखरण केली आणि त्यांचे कोरियातले अनुभव आणि त्यांनी चीनला दिलेली भेट याचे उपाख्यान लावले. कोरियन युद्धात चिनी सैनिक कसे शौर्याने लढले (!) यांच्या कथा त्यांनी आम्हाला ऐकवल्या एवढेच नव्हे तर दिल्लीत सध्या उजव्या गटाचे लोक पंडित नेहरूंना कसे टोमणे मारताहेत, भांडखोर सरकारी अधिकाऱ्यांनी चिन्यांच्याबाबतीत ताठ भूमिका घ्यायला पाहिजे, असा नेहरूंच्या मागे कसा लकडा लावलेला आहे याची माहिती देऊन, आम्हाला राजकीय पार्श्वभूमी समजावून सांगितली. एका महत्त्वाच्या मोहिमेची योजना आखण्यासाठी ही सभा आहे असे वाटतच नव्हते. बोलण्यात कुठेही गांभीर्य असे नव्हतेच. नुसत्या गप्पा चालल्या होत्या ! हे मी एकटाच ऐकत नव्हतो. जनरल कौल यांचे भाष्य आणि त्यांच्या आयुष्यातल्या आठवणी सबंध ऑर्डर ग्रुप ऐकत होता. माझ्या जबाबदारीची जाणीव ठेवून माझ्यातर्फे आणि माझ्या कमांडिंग ऑफिसर्सतर्फे असे निक्षून सांगू शकतो की चिन्यांना हुसकून देण्याच्या या गंभीर प्रश्नाकडे पाहण्याचा जनरल कौल यांचा हा खेळीमेळीचा दृष्टिकोण पाहून आम्हांला बिलकूल उत्साह वाटत नव्हता. वस्तुतः ता. ८ ऑक्टोबरला संध्याकाळी आम्हाला तर असे वाटत होते की, आघाडीवरची परिस्थिती प्रत्यक्ष डोळ्यांनी

पाहिल्यानंतर आता तरी जनरल कौल भारत सरकारला असे सांगतील की, "चिन्यांना हुसकून देण्याचे प्रयत्न सोडून द्या!" कदाचित हे आतून पटल्यामुळेच जनरल कौलनी नुसता खेळ चालवला होता! कुठल्याही निश्चित योजनेची सविस्तर आणि बारिकसारिक चर्चा करण्याच्या भरीस ते पडले नाहीत. ता. ७, ८ आणि ९ ऑक्टोबरच्या प्रत्येक रात्री जनरल कौल आघाडीवरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना इशारा देणारे लांबलचक लिखाण करीत होते. तिथे ऑफिस किंवा स्टाफ नसल्यामुळे मी आणि कर्नल राव त्यांचे कारकून बनलो होतो. जनरल कौल यांचे लंबेचवडे रिपोर्टस् आम्ही सविस्तर लिहून काढत होतो. जनरल कौलनी डिक्टेट करायचे आणि माझ्यासारख्या वरिष्ठ ब्रिग्रेडियरने कारकुनासारखे ते लिहून घ्यायचे याचा मला मनःस्ताप झाला. त्यातली पुष्कळशी विधाने स्पष्ट शब्दांत अशी असत, की ज्यामध्ये आपल्या निराशामय कमकुवतपणाचे चित्र रंगवलेले असे आणि पुढे घडून येऊ शकणाऱ्या गंभीर परिणामांची जाणीव करून दिलेली असे. आणि असे असूनदेखील जनरल कौल असे आश्वासन देऊन खाली सही ठोकत असत की, "तरीदेखील चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी मी पार पाडीन" अशा प्रत्येक वेळी मी गोंधळून गेलो. मला हे समजू शकत नव्हते की रिपोर्टमध्ये दिलेली गंभीर वस्तुस्थिती आणि खाली दिले गेलेले भाबडे आश्वासन हे एकमेकांच्या विरुद्ध कसे?

एकदा का रात्री हा अहवाल लिहून झाला की, दुसऱ्या दिवशी सकाळी पंजाब्यांपैकी एखादा धट्टाकट्टा शीख जवान बोलवून घेऊन त्याला सांगितले जाई की, "जा ऽऽ! धावत जा! आणि हा अत्यंत महत्वाचा रिपोर्ट लूंपूला जाऊन देऊन ये!" जवानाला 'रनर' बनवला जाई! लुंपूला हा मेसेज पोचला की झिमीथांग (Zimingthaung) या ठिकाणी लुंपूवरून सेकंड–इन–कमांड त्याची पोच पावती टेलिफोनवरून देणार आणि तिथून तो रिपोर्ट सांकेतिक लिपीत तेझपूर, दिल्ली आणि लखनौ या ठिकाणी कळविला जात असे. ही असली अडाणी पद्धत हेच दाखवीत होती की, ऑक्टोबर ६२ मधील इतिहास वेगळा घडणार आहे! यापैकी पहिला संदेश दिल्लीला मोजून ३ दिवसांनंतर पोचला. त्यामुळे संरक्षणमंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांना अतिशय त्रास झाला! त्यांनी असा आग्रह धरला की, "हेडक्वार्टर ईस्टर्न कमांडच्या चीफ सिग्नल ऑफिसरला डिस्मिस् करून टाका! नालायक! एक निरोप डिफेन्स मिनिस्टरला पोचवायला ३ दिवस लागतात? सरतेशेवटी सन्माननीय संरक्षणमंत्र्यांना शांत करण्यासाठी फार यातायात करावी लागली. त्यांना पटवून दिले गेले की, साहेब! या दिरंगाईत त्या ऑफिसरची काही चूक नाही! आपली संपर्क साधण्याची व्यवस्थाच सदोष आहे! ते दिवसच असे होते की, कुणाची जर का चूक झाली असे वाटले, तर सगळ्यांत सोपा मार्ग हा की, त्याला 'डिसमिस' करून टाका! उच्चपदस्थ (!) लोकनियुक्त प्रतिनिधींनी वर्षानुवर्षे पर्वतमय प्रदेशात लढण्यासाठी आवश्यक असलेली साधने भार-

तीय लष्कराला पुरवलेली नाहीत, याचा त्या वेळी सर्वांना सोयीस्कररीत्या विसर पडला होता !

आता सबंध मोहिमेचे प्राक्तन ठरविणारा निर्णय ज्या दिवशी घेतला गेला त्या ता. ९ ऑक्टोबर या महत्त्वाच्या दिवशी घडलेल्या घटनांकडे वळू. ता. ९ ऑक्टोबरला सकाळी सबंध ऑर्डरग्रुपची दुसरी सभा झाली. जनरल कौल यांनी त्या वेळी त्यांच्या टेहळणीच्या अहवालाबाबतचा गौप्यस्फोट ( ! ) केला. लष्करी दृष्टचा विचार करता परिस्थिती चिन्यांना अनुकूल असल्यामुळे त्यांना हुसकून देता येणे अशक्यच आहे हे त्यांनी जाहीर केले. ते समजून चुकले होते की, थाग-ला प्रदेशात आपण काहीही हालचाल केली तरी आपला फायदा होणार नाही.

जनरल कौल दिल्लीहून येतानाच एक बाँबगोळा घेऊन आले होते. अखेर त्यांनी तो बॉम्ब आमच्यावर टाकला ! ते म्हणाले, "चिन्यांविरुद्ध केल्या जाणाऱ्या लष्करी कारवाईविरुद्ध ज्या विधानांचे खंडन करता येणार नाही, अशी स्पष्ट परिस्थिती असूनदेखील ता. १० ऑक्टोबरला काहीतरी हालचाल करावीच लागेल. कारण कॅबिनेटने त्यांना असं स्पष्ट बजावलंय की, परिणाम काहीही होवोत. ता. १० ऑक्टोबर ही चिन्यांविरुद्ध हालचाल करण्याची अखेरची तारीख आहे !" पुढे ते असे म्हणाले की, "आर्मी कमांडर जनरल सेन यांनी प्रथम सरकारला असे आश्वासन दिले होते की ता. २९ सप्टेंबरपर्यंत ते चिन्यांना हुसकून देतील. नंतर जनरल सेननी ही तारीख लांबणीवर टाकून ता. १ ऑक्टोबर केली आणि त्यानंतर ता. ५ ऑक्टोबर केली. साहजिकच दिल्लीमध्ये असा समज झाला की, आपल्या आघाडीवरच्या तुकड्या उगाचच वेळकाढूपणा करताहेत. आणि 'हालचाली' जलद होऊन शक्य तितक्या लवकर चिन्यांना हुसकले जावे म्हणून मला (जनरल कौल यांना) खासकरून आघाडीवर पाठविण्यात आलेले आहे. जनरल कौल पुढे म्हणाले की, "ज्या तारखा ( ! ) आर्मीनेच नक्की केल्या होत्या त्यांत वारंवार बदल केला गेल्यामुळे साहजिकच भारत सरकारचे मंत्रिमंडळ संतप्त झाले आहे हे समजून घेतले पाहिजे ! आम्ही चिन्यांना हुसकून देऊ शकतो, अशी भलावण करून भारतीय लष्करानेच भारत सरकारची दिशाभूल केलेली आहे !"

जाता जाता जनरल कौलनी असेही विधान केले की, "देशाच्या हिताच्या दृष्टीने चिन्यांना हुसकणे आवश्यक आहे. मग भले आपली २०,००० माणसे मेली तरी बेहेत्तर !" जनरल कौलना अशी आशा होती की, घटना घडतात त्या आपल्या इच्छेप्रमाणेच ! सगळाच गोंधळ होता. हवेत किल्ले बांधले जात होते.

थाग-ला प्रदेशात चिन्यांवर उघडउघड सरळ हल्ला करता येण्याची शक्यताच नव्हती, म्हणून जनरल कौलनी त्यांचे 'ते' पोझिशनल वॉरफेअर( ! )चे लष्करी डावपेच सुरू केले. थाग-ला प्रदेशाच्या पश्चिमेकडचे Yumtsola हे ठिकाण चिन्यांनी अजून 'मोकळे' सोडले होते, ते काबीज करण्याचे त्यांनी ठरवले. जनरल कौल

म्हणाले की, "असं काही केलं तर भारत सरकारची अशी खात्री पटेल की, सरकारचे हुकूम अमलात आणण्यासाठी भारतीय लष्करानं प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे." जनरल कौल ठासून सांगत गेले की, "ही मोहीम ता. १० ऑक्टोबरला सुरू झालीच पाहिजे. कारण ता. १० ऑक्टोबर ही तारीख पुढे ढकलण्याचे स्वातंत्र्य त्यांना नाही!"

आता हे स्पष्ट होत होते की, ता. ९ ऑक्टोबरपर्यंत अपुऱ्या तयारीनिशी ७ वी पायदळ तुकडी 'पुढे जावी' असा आग्रह त्यांनी का धरला होता? तेझपूरला घाईघाईने '७ व्या पायदळ तुकडीची काहीही करून धोला या ठिकाणी जमवाजमव केली पाहिजे,' हा निर्णय का घेतला गेला याचा आपल्याला अंदाज बांधता येतो. इथून पुढे आपल्या लष्कराने निवडलेली चुकीची ठिकाणे, ब्रिगेडिअर्सनी अगोदरच (!) तयार केलेल्या योजना यांची चर्चा केली नाही तरी काही अडणार नाही; कारण या सगळ्या अडचणी ता. ९ ऑक्टोबरला जनरल कौलनी केलेल्या चुकीच्या अंदाजांचे गंभीर स्वरूप सौम्य करण्यासाठी सांगितल्या जात आहेत. जनरल कौल यांच्या नेतृत्वाचे वर्णन Corelli Barnett च्या शब्दांत असे करता येईल की, "एखाद्या पाद्रयानं बौद्धिक डावपेच लढवून लोकांशी खेळ खेळावा त्याप्रमाणे जनरल कौल नुसत्या गप्पा मारीत मारीत युद्धाचा खेळ करून टाकीत होते!"

ता. १० ऑक्टोबरला २/ राजपूत या तुकडीला Yumtsola या ठिकाणी जाऊन चिन्यांच्या पाठीमागे जाऊन बैठक मारण्याचा हुकूम जनरल कौल यांनीच दिला होता.

हा हुकूम दिला गेला त्या वेळी २/ राजपूतचे जवान नुकतेच कार्पोला खिंडीवरून खडतर प्रवास करून आलेले होते. त्यांचा थकवा अजून गेलेला नव्हता. सगळ्याच बाबतीत आपली असलेली अक्षरशः आणिबाणीची परिस्थिती आणि उणीवा यांची माहिती असूनदेखील जनरल कौल यांनी २/ राजपूत आणि १/९ गुरखाज यांची नामका-चूच्या परिसरात जमवाजमव करण्याचा हुकूम दिला. या तुकड्यांची सांगधरपासून नामका–चूपर्यंतची हालचाल चिनी पाहत होते. ते सावध झाले. भारतीय सेनेच्या मोठ्या प्रमाणावर घडणाऱ्या जलद आणि तावडतोब हालचालींनी दुसऱ्या दिवशी चिन्यांकडून घडलेल्या हालचालींना प्रोत्साहन दिले असले पाहिजे यात शंकाच नाही. धोला हे ठिकाण म्हणजे मृत्यूचा जबडा आहे अशी ओरड ज्या जनरल कौलनी पूर्वी केली होती, त्यांच्याच हुकमाने आपले जवान आणि आपली सबंध ब्रिगेड आता धोला या ठिकाणी पाठवली गेली होती.

ज्यांना हुकूम फर्मावला गेला, त्यांची या बाबतीतली प्रतिक्रिया सांगण्यापूर्वी लष्करीदृष्ट्या माझ्या लक्षात आलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टी अगोदर आपल्या निदर्शनास आणतो. पहिली म्हणजे रणक्षेत्र कसे होते ती आणि दुसरी म्हणजे ज्या पद्धतीने लढाईच्या हालचाली घडवून आणल्या गेल्या ती. प्रथम ज्या ठिकाणी लढा-

यचे होते ती जमीन कशा प्रकारची होती ते पाहू. ' जमीन ' या शब्दाचा अर्थ नीट लक्षात घ्या. जमीन म्हटली म्हणजे तुमच्या डोळ्यांपुढे सपाट जमीनच येणार. पण आघाडीच्या जमिनीची उंची ही या युद्धात निर्णायक होती. ' Cassino–Portrait of a Battle ' या पुस्तकाचा लेखक Majdalany यांनी असे म्हटलेच आहे की–

" लढाईमध्ये शस्त्रास्त्रं हे सैनिकाचं साधन असतं. पण तो ज्या ठिकाणी लढत असतो ती ' जमीन ' हा लढाईचा पाया असतो. सगळ्या युक्त्या प्रयुक्त्या रण-क्षेत्राच्या स्वरूपावर अवलंबून असतात आणि दुसऱ्या कुठल्याही गोष्टींपेक्षा लढाईची जागा हीच लढाईच्या व्याप्तीचं स्वरूप ठरवीत असते."

पर्वतमय प्रदेश हा तांत्रिक दृष्टचा काही खास अडचणी निर्माण करू शकतो. उंच प्रदेशाचा कबजा शत्रूकडे असेल तर बघायलाच नको ! फारच मोठी आपत्ती असते ती. कारण वरून आपल्या हालचाली शत्रू सहज पाहू शकतो. ' त्यांच्या ' तोफखान्याचा एक अधिकारीदेखील तावडतोब बिनतारी संदेश देऊन अशी व्यवस्था करू शकतो की, वरून शत्रूच्या तोफा आग ओकू लागतील. अगदी थोड्या वेळात वरून नीट पाहून, नीट अंदाज घेऊन शत्रू अशा तऱ्हेने गोलंदाजी करतो, की आपण नेमके त्यांच्या टप्प्यात असू. शत्रू आपल्या हालचाली उंच ठिकाणाहून जितक्या चांगल्या तऱ्हेने पाहू शकतो, तितके आपण अडचणीत येतो. अशा परिस्थितीत लष्करी डावपेचांची रचना ती काय करणार ! वरून सगळं बघतायत ना ते !

अद्ययावत शस्त्रात्रे आणि दारूगोळा असलेले चिनी सैन्य थाग-ला प्रदेशातल्या सुरक्षित अशा १५,००० फूट उंचीवर होते. वरून ते सगळे काही नीट पाहू शकत होते. तशातच थाग-ला प्रदेश हा चिन्यांच्या दृष्टीने फक्त वादग्रस्त टापूच नव्हता तर तो प्रदेश त्यांच्या दृष्टीने त्यांचाच होता. मॅकमोहन रेषा ही सरहद्दीची रेषा म्हणून मानली तरीदेखील ती थाग-ला प्रदेशातून जात नाही असे त्यांचे म्हणणे होते. डावपेचांच्या दृष्टीने ली या ठिकाणी असलेला चिन्यांचा तळ ते वरून पाहू शकत होते. अशा त्या उंच प्रदेशाचा चिन्यांना तिथून हुसकून देऊन कबजा घेणे ही गोष्ट चांगलीच तयारी असल्याशिवाय शक्य नव्हती. भोळेपणा आणि आशावाद यांच्या उत्साहाच्या भरात अशी कल्पनादेखील करणे चुकीचे होते की, आता चिनी साळ-सूदपणे लढाईच्या अगोदरच त्यांची चांगली जागा सोडून जातील ! कारण आपण तर जगजाहीर करून टाकले होते की एका असामान्य जनरलच्या नेतृत्वाखाली आमच्या पायदळ तुकड्या चिन्यांना हुसकून देण्याच्या खास कामगिरीवर रवाना करण्यात आल्या आहेत. चिनी मनात म्हणाले, ठीक आहे ! आम्हांला हुसकून लावण्यासाठी फौजा पाठवता काय ? मग पाठवाच. एकदा हरलात तर तुम्हांला जगात तोंड दाखवायला जागा राहणार नाही. कुठल्याही परिस्थितीत आता लढाईशिवाय थाग-ला प्रदेश सोडून जाणार नाही. चिन्यांची त्या वेळची विचारसरणी ही अशी होती.

शत्रूकडून ताबडतोब टोला मिळणार नाही अशी खात्री असली तरीदेखील आघाडीवर एका बटालियनची हालचाल घडवून आणीत असताना सावध असावे लागते. फार काळजी घ्यावी लागते. आघाडीवरचे ऑफिसर्स आणि नॉन कमिशंड ऑफिसर्स यांना रणक्षेत्राची टेहळणी करण्याची संधी न देताच, त्यांना योजना तयार करू न देताच, स्पष्ट हुकूम न देताच, ज्या हालचालींचे पुढे लढाईत रूपांतर होऊ शकेल अशी पायदळ तुकडयांची हलवाहलव करू नये, हे युद्धशास्त्रातले स्वयंसिद्ध तत्त्व आहे. हे साधे तत्त्व आणि नेहमीचा प्रघातदेखील भारत-चीन युद्धात पाळला गेला नाही.

राजकीय विचार काहीही असोत, जनरल कौल यांनी घेतलेल्या निर्णयात हे स्वच्छ जाहीर होत होते, की ते निर्णय घेण्यापूर्वी जेवढी काळजी घ्यायला पाहिजे होती, तेवढी त्यांनी ती घेतलेली नाही राजकीयदृष्टचा जनरल कौलना घाई सुटली होती. ते ब्रिगेडला हुकूम देत सुटले की 'कसंही करून जा, पण पुढं जा! नामका-चूच्या परिसरात चांगला पवित्रा घ्यायला त्यांनी कुणाला वेळच दिला नाही. जखमी जवानांना सुरक्षित स्थळी हलवणे, दारूगोळयाचा पुरवठा आणि असेच इतर अनेक ऐहिक प्रश्न ज्याचे त्याने सोडवायचे होते.'

जनरल कौल यांच्या या नेमणुकीच्या घोषणेचे स्वागत फार चमत्कारिक झाले. बहुतेक सर्वजण या बातमीने थक्क झाले. कुणाचा विश्वासच बसेना! लेफ्टनंट कर्नल रीख यांनी ही बातमी ऐकून माझ्याकडे अशा तऱ्हेने पाहिले, की त्यांच्याकडे बघत असतानाच लक्षात यावे, की यांची आधीच गाळण उडालेली आहे. जनरल प्रसाद यांच्याकडे पाहिले तर वाटत होते, की त्यांना असं म्हणायचंय, की 'आता कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!' मी स्वतः सुन्न झालो. माझी मतीच चालेना. काही वेळ मी तर निःशब्द झालो. काय बोलणार? लेफ्टनंट कर्नल आलुवालिया हळूच म्हणाले, "आता काहीही होऊ दे. माझं नशीब जोरावर आहे की मी तरी निदान या वेळी त्यांच्या तडाख्यात सापडणार नाही आहे." लेफ्टनंट कर्नल मिश्रा माझ्याकडे बघत पुटपुटले की, "जो कुणी नामका-चू नदी ओलांडून उत्तरेकडे जाऊन चौकी बांधण्याचा प्रयत्न करील त्याला (!) चिनी साफ करून टाकतील." एखाद्या जादुगाराने पोतडीतून अचानक ससा बाहेर काढून दाखवून स्वतःवरच खूष झाल्याच्या नजरेने प्रेक्षकांकडे बघावे तशा खुषीत जनरल कौल आले. पण नंतर मात्र त्यांच्या नजरेत बदल झाला. या त्यांच्या बदललेल्या नजरेत असा उघड विरोध आणि अर्थ होता की, माझा हुकूम मोडण्याचे धाडस तुला झाले तरी कसे?

लेफ्टनंट कर्नल रीखनी मला बाजूला घेतले आणि त्यांचा राग त्यांनी मोकळा करून टाकला. ते मला स्पष्टपणे म्हणाले की, "तिकडं समोर चिन्यांचा समुद्र पसरलाय आणि कुठलीही निश्चित लष्करी कामगिरी सोपवलेली नसताना, काहीही तयारी नसताना, माझी बटालियन त्या समोरच्या समुद्रात बुडवायला मी तयार

नाही. हा हुकूम म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. मला तर काही सुचतच नाही आहे. तुला काय वाटतं ?"

मी त्यांच्याकडे निराशेने पाहिले. माझ्याकडे त्यांच्या प्रश्नाचे उत्तरच नव्हते. अशा चमत्कारिक बिकट परिस्थितीत मी यापूर्वी कधीही सांपडलो नव्हतो. आता असा एक कोअर कमांडर आला होता की, तो कमांडिंग ऑफिसर्स आणि तरुण नवख्या अधिकाऱ्यांपुढे वरिष्ठ अधिकाऱ्यांना भराभर हुकूम सोडणार होता. त्यांच्याविरुद्ध मी कसे आणि काय बोलणार ? त्यांच्याशी कसा वाद घालणार ? सरकारी नोकरीत–विशेषत: लष्करात–वरिष्ठांशी कनिष्ठांनी वाद घालायचा नसतो. त्याचा काही उपयोग होत नाही. ' बरं रे बाबा, तू मोठा ! तुझं बरोबर आहे ! ' असे म्हटले नाही तर आफत येते. तशातच वाद घालण्याच्या बाबतीत अत्यंत पुरोगामी असलेला ' ऑर्डर ग्रुप ' जनरल कौल यांच्याजवळ होता. एकमेकांचे विचार समजावून घेणे, एकत्र बसून शांतपणे विचार करून योजना आखणे, सर्वांना पटतील असे निर्णय घेणे हे प्रश्नच नव्हते. बरोबर आहे ! कारण लष्कर म्हणजे काय लोकशाही आहे, की कुणाही रेम्याडोक्याने अक्कल नसताना ' व्होट ' द्यावे ! लष्करी निर्णय ' बहुमता 'ने घ्यायचे नसतात. (इति जनरल कौल !) लढाईसाठी सार्वमत घेतले जात नाही. एखादा विशिष्ट निर्णय जरी एक लाख लष्करी माणसांनी मंजूर केला तरी त्यावर अखेरचे शिक्कामोर्तब होते फक्त एकाच लष्करी अधिकाऱ्याकडून ! त्या निर्णयाची जबाबदारी त्याच्यावर असते.

आपले नाव कसे होईल या बाबतीत जनरल कौल फार जागरूक होते आणि मला असे वाटत नाही, की अमुक एक तारखेच्या आत चिन्यांना हुसकून दे अशी लक्ष्मण रेषा कॅबिनेटने त्यांना आखून दिली असेल ! आम्हा कनिष्ठ (!) लष्करी अधिकाऱ्यांतर्फे मी इतकेच सांगू शकतो की कृतीने वाघ व्हा, पण आज्ञा पालनात कुत्रा व्हा, हा आदेश आम्हांला दुसऱ्यांदा दिला जात होता.

काही वेळ गेल्यानंतर मी अशी शंका व्यक्त केली की, " कौलसाहेव, चिन्यांनी काही गडबड केली नाही तरीदेखील Yumtsola या ठिकाणी राजपूत तुकडीला आपण कसे काय पोसणार ? तिथे फार थंडी असते आणि आपल्याकडे तर गरम कपड्यांचा तुटवडा आहे. " त्यावर हसत हसत आनंदाने जनरल कौल आम्हांला म्हणाले, " काळजी करू नका रे ! कॅनडाहून ६००० गरम कपड्यांचे जोड विमानाने येताहेत ! " राजपूत तुकडी दुसऱ्या दिवशी मोहिमेवर जाण्यासाठी निघेपर्यंत ते विमानाने येणारे गरम कपड्यांचे जोड अर्थातच आलेले नव्हते. ' ते ' विमान जमिनीवर उतरेपर्यंत १६,००० फूट उंचीवर राजपूत जवान कसे काय जगणार आहेत, या प्रश्नाचे जनरल कौल यांच्याजवळ उत्तर नव्हते.

तोफखान्याच्या रचनेची सोय कशी करायची, हा प्रश्न विचारायची खोटी. जनरल कौलजवळ उत्तर तयार–" अरे, इच्छा आहे तिथे मार्ग आहे. तोफखान्याची

जरूरच काय ? लढण्याची तीव्र इच्छा ठेवा म्हणजे झालं ! " Lord Haig's च्या वरताण ! कारण १९१२ मध्येच Lord Haig's ने असे म्हटले होते की, "तोफखान्याचा खरा उपयोग फक्त अननुभवी तुकड्यांपुढेच होतो " समोरचे सैनिक काय अननुभवी छोकरे होते ? चिनी होते चिनी ! जगातले पहिल्या दर्जाचे तय्यार सैनिक ! त्यांना हरवायला तोफखाना नको ! आम्ही आग्रह धरला की तोफखाना पाहिजेच. त्यावर जनरल कौल म्हणाले की, " आणखी पॅरा-गन्स विमानातून खाली टाकण्याची व्यवस्था मी करीन ! "

गरम कपडे आणि बंदुका ह्या दोन्ही गोष्टी, राजपूत जवान चिनी बांधवांच्या (! ) पाठीशी उभे राहिल्यानंतर (! ) मग त्यांना मिळणार होत्या ! आग्र्यावरून त्या बंदुका केव्हा येणार आहेत ते फक्त परमेश्वराला ठाऊक !

हमालांची सोय काय आहे या प्रश्नाला वाटाण्याच्या अक्षता लावून जनरल कौलनी तो उडवून दिला. ते म्हणाले, " बॉर्डर रोडस् ऑर्गनायझेशनचे सगळे हमाल मी पाठवून देईन. ! " लुंपूपासून पुढे सामान आणू शकणाऱ्या हमालांची आम्ही अजून वाट पाहत होतो. आणखी हमाल येणार होते. आलेले मात्र कुणीच नव्हते. राजपूत जवानांना आधी पुढे जाऊ दे ! बाकी काय ते भविष्यात !

जनरल कौल यांच्या ह्या भलत्याच आत्मविश्वासावर आणि आशावादावर आम्ही नाखूष होतो. वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले की अडचणी आपोआप दूर होतात ह्या चमत्कारिक विचारसरणीला मान्यता देणे आम्हांला शक्यच नव्हते. अत्यंत निराशेने मी जनरल कौलना म्हटले की, " सबंध बटालियन पुढं पाठवण्याअगोदर थोडेसे जवान पुढं पाठवावेत असं आपलं मला वाटतं ! " जनरल कौलना माझे म्हणणे पटले आणि शेवटी असे ठरले की, मेजर चौधरींच्या नेतृत्वाखाली एक लहानशी तुकडी पुढे पाठवावी. कारण मेजर चौधरींना त्या प्रदेशाची चांगलीच माहिती होती. त्यांच्यावर अशी कामगिरी सोपवली गेली होती की, " नामका-चू नदी ओलांडून पलीकडे जाण्यासाठी एखादी सुरक्षित आणि चांगली जागा शोधून काढून पलीकडे जा. निदान आपण नदी ओलांडली तर चिन्यांची प्रतिक्रिया काय असेल याचा अंदाज येईल. "

नामका-चू नदी ओलांडून पलीकडे जाण्याचा ता. ९ ऑक्टोबरला घेतल्या गेलेल्या या निर्णयाचा ब्रिगेडच्या योजनांशी काही संबंध नव्हता; तर ता. १० ऑक्टोबरला आंधळेपणाने राजपूत तुकडी Yumtsola या ठिकाणी पाठवण्याचा घाईगर्दीचा जो हुकूम जनरल कौलनी दिला होता, तो आपली एक तुकडी चिन्यांच्या भक्ष्यस्थानी पडू नये म्हणून सौम्य करण्याचा त्यामागे हेतू होता.

जनरल कौल असे म्हणतात की, ही लहानशी तुकडी ता. ८ ऑक्टोबरला पाठवली गेली. प्रत्यक्षात ती ता. ९ ऑक्टोबरला पाठवली गेली होती. तारखेला महत्त्व आहे. उगाच काहीतरी सांगायचे हा हेतू नाही. चिन्यांच्या कागदोपत्री पुराव्याप्रमाणे

" सेंग-जाँग या ठिकाणच्या भारतीय लष्कराच्या एका लहानशा तुकडीने ता. ९ ऑक्टोबर १९६२ या दिवशी कबजा घेतला."

या तारखेच्या फरकाबद्दल लिहिताना मेजर जोहरी म्हणतात, "...आणि म्हणूनच चिन्यांचं म्हणणं बरोबर आहे असं धरून चालणं अधिक तर्कशुद्ध ठरेल. जर का सेंग–जाँग या ठिकाणावर आपण ता. ९ ऑक्टोबरला कबजा केला असेल तरच त्याचा अर्थ असा होऊ शकेल की, कोअर कमांडर जनरल कौल यांनी थाग-ला प्रदेशाच्या दक्षिणेकडून चिन्यांना हुसकून देण्याच्या या योजनेची 'त्या' सभेत चर्चा केली असेल. एरव्ही आघाडीवर एक आठवडाभर त्यांना मुक्काम ठोकून राहण्याचं कारणच काय होतं? थोडक्यात सांगायचं तर राजपूत तुकडीच्या थोड्या जवानांनी सेंग-जाँगचा कबजा घेण्याची योजना जनरल कौल यांची मान्यता घेऊन मगच ठरली असं म्हणणंच बरोबर आणि तर्कशुद्ध ठरेल."

मेजर जोहरींचे हे म्हणणे अगदी बरोबर आहे. फक्त त्यात चूक एवढीच झाली आहे की, ही पुढे पाठवलेली लहानशी तुकडी पंजाब्यांची होती, राजपूत नव्हती!

ता. ९ ऑक्टोबरच्या त्या रात्री ब्रिगेडिअर के. के. सिंग आणि ब्रिगेडिअर एम्. आर. राजवाडे हे दोघे दमून भागून पूल क्रमांक ४ जवळ आले. ते इतके थकले होते की कुठलीही सुसंबद्ध योजना विचारपूर्वक तयार करणे त्यांना शक्यच नव्हते. शरीरात त्राण नसलेला माणूस विचारपूर्वक योजना आखूच शकत नाही. आल्या-बरोबर अतिश्रमाने त्यांनी बसकण मारली. जेवायला उठण्याइतकेदेखील त्यांना त्राण नव्हते. हे मी मत्सराने, त्यांची टवाळी करण्याच्या हेतूने सांगत नाही. उलट त्यांचे धैर्य आणि थोरवी यांची ही स्तुतीच करतोय. कशी? एखाद्या नटाने खलनायकाची भूमिका इतकी उत्तम वठवावी की, प्रेक्षकांना त्याला जोड्याने बडवावा असे वाटावे तशी! कारण खडतर प्रवासाने ते दोघे दमले होते. टिकले कसे याचंच मला आश्चर्य वाटतंय, कारण त्याच मार्गाने येऊ घातलेल्या कोअर आर्टिलरी कमांडरला तो प्रवास करताना इतका दम लागला होता, की तो फार मागे राहिला होता.

४ थ्या कोअरची निर्मिती झालेली नसताना आणि ता. १० ऑक्टोबरला लढण्याची घाई असताना त्यांना दोघांना ढोलापर्यंत फरफटत ओढीत आणणे हा मूर्खपणाचा कळस होता. लेफ्टनंट कर्नल संजीवराव G. S. O. I. हे जनरल कौल यांच्याबरोबरच होते. आता तर दोन ब्रिगेडिअर्सदेखील आघाडीवर आलेले! आता 'G' ब्रँचचा नाव घेण्यासारखा एकही जबाबदार असामी तेझपूरला उरला नव्हता. युद्धाची योजना आखणारा कुठला कमांडर ही परिस्थिती निर्माण करायला परवानगी देईल?

लढाई आघाडीवर होत असते, पण पाठीमागे असलेल्या हेडक्वार्टरमध्येदेखील

फार मोठी कामे असतात. त्या कामांचा लढाईशी संबंध असतो, हे कुणी लक्षातच घेतले नाही. शेवटी व्हायचे तेच झाले. दुसऱ्याच दिवशी चिन्यांनी आपल्यावर हल्ला केला. आपल्या टोप्या सांभाळीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आघाडीवर नुसती गर्दी केली होती. त्यांत काही असे होते, की ज्यांना निश्चित असे काहीच काम नव्हते. काय होतंय, लढाई कशी काय चालली आहे ते बघण्यासाठी आणलेले ते पंच होते, असे मोठ्या खेदाने मला म्हणावेसे वाटते; दुसरा इलाज नाही.

अशा तऱ्हेने ता. १० ऑक्टोबर १९६२ या महत्त्वाच्या दिवशी थाग-ला प्रदेशात १५,००० फूट उंचीवर प्रथमच भारत आणि चीन यांच्यांत सैनिकांची चकमक घडली. एक नवा इतिहास त्या दिवशी घडला. सर विन्स्टन चर्चिल यांच्या उद्‌गारांत थोडा फरक करून म्हणायचं तर – "उदात्त शब्द, पवित्र हेतू आणि वीरश्रीची भाषणे यांना अखेर शस्त्रसज्ज, करारी, दुष्ट चिनी सामर्थ्यापुढे नमते घ्यावे लागले!"

काय घडले ता. १० ऑक्टोबरला ? [क्रमशः]

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher.


पुरंदऱ्यांची नौबत

बुलंद बुरूज / हूल / कोजागिरीची रात्र / पंत
फोंडा ! फोंडा ! / नावजी बलकवडे
पिऱ्या बेरड / इमान

आठ शिवकालीन कथा

ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये
राजहंस प्रकाशन

तिसरा आक्षेप हा अज्ञानावर आधारलेला आहे. नगरपालिकांनी आपल्या कक्षेतील मंदिरांची, मशिदींची, गुरुद्वारांची देखभाल करण्यासाठी जमिनी ताब्यात घेणे अथवा असलेल्या देणे हे घटनाविरोधी नाही. निधर्मीपणाच्या आडही येत नाही. यासंबंधी न्यायालयांचे निकाल उपलब्ध आहेत. ' इंडियन सेक्युलर सोसायटी ' ने हे निर्णय त्यांना मान्य नसल्यास वाटल्यास सुप्रीम कोर्टात जावे. या बाबतीत कायद्याचे अनभिज्ञ चर्चा ती काय करणार ? सर्वसाधारणपणे हिंदू मंदिरांपेक्षा मुसलमान हे आपल्या प्रार्थनास्थळांची स्वच्छता व पावित्र्य अधिक चांगले ठेवतात. माझ्या मते तर गावातील असलेली मंदिरे ज्यांना स्वच्छ व पवित्र ठेवता येत नाहीत, त्यांनी नवी मंदिरे बांधून गाव अधिक विद्रूप न केलेलेच चांगले. गाव दंगलीने विद्रूप होईल, या भयापोटी मात्र मंदिर बांधण्याचा हक्क हिंदूंनी सोडता कामा नये. दंगल हे दुधारी शस्त्र आहे. हा खेळ बहुसंख्य समाजालाही उत्तम खेळता येईल, हे सर्वांनी नीट समजून घेतल्याखेरीज तेढीचा प्रश्न सुटणार नाही. गल्लीबोळांतल्या सेक्युलर सोसायट्या हा त्यावर उपाय नव्हे !

गोध्रा येथील जातीय दंगलींबाबतचा इतिहास मला ठाऊक आहे. एकाच ठिकाणचा का, सर्वच जातीय दंगलींचा इतिहास थोर सोसायटीने निःपक्षपातीपणाने तपासावा.

' भारताच्या गृहखात्याने यंदा २३ जातीय दंगलींची पाहणी केली. त्यांतील २२ दंगली मुसलमानांनी सुरू केल्याचे आढळले, ' असे स्वतः अ. भि. शहाच सांगतात. त्यांच्या अन्य ठिकाणी, निराळ्या संदर्भात प्रसिद्ध झालेल्या पत्रातील ही त्यांनीच दिलेली माहिती मी ' मुक्ताफळा 'त हेतुतःच उद्धृत केलेली होती. या बाबतीत श्री. चित्रे यांना काही नवा मुद्दा मांडायचा आहे काय ? मुसलमानांनी दंगल सुरू केल्यानंतर त्याची प्रतिक्रिया जरा जास्तच अंशाची कशी झाली, याची गणिते मांडून बहुसंख्याकांनाच धोपटण्याचे काम फक्त ' इंडियन सेक्युलर सोसायटी ' करणार आहे की काय ?

आता वेदाभ्यासावरील माझ्या मजकुरासंबंधी :

वेदांमध्ये अस्पृश्यतेचा पुरस्कार आहे म्हणून वेदविद्येला सरकारने प्रोत्साहन देऊ नये, अशी प्रा. शहांनी टीका केली असती तर या विचारातला अर्धवटपणा दिसत असूनही, आमचा त्यांच्याशी तंटा करण्याचा इरादा झाला नसता. पण शहा घसरले ते एकदम निराळ्याच मुद्यावर ! वेदविद्येच्या अभ्यासाला सरकार अनुदाने देते, मग कुराण व बायबलच्या पठणाला का देत नाही ? म्हणजे बायबल, कुराण यांच्या अभ्यासाला अनुदाने दिली तर वेदविद्येला द्यायला हरकत नाही, असे प्रा. शहांचे म्हणणे ! यात स्पृश्यास्पृश्यतेचा संबंधच कुठे येतो ? म्हणून मी गम-

तीने असे स्पष्टीकरण दिले की जे धर्म बहुपत्नीत्व व बहुप्रसवाचा पाठपुरावा करतात त्यांना सरकार आर्थिक प्रोत्साहन देत नसावे ! हा काही सरकारी खुलासा नव्हता. माझी मुख्य टीका पुढे अशी होती की, निधर्मीपणाचा आग्रह धरणाऱ्या सरकारचे मुख्य काम सर्वांना समान कायदा लावणारे 'सिव्हिल कोड' लागू करण्याचे आहे, तेव्हा शहासाहेबांनी 'सिव्हिल कोड' लागू करण्याची चळवळ सोसायटीमार्फत आधी हाती घ्यावी आणि तोपर्यंत काय वेदविद्यासंपन्नता येईल ती येऊ दे !

श्री. चित्रे यांच्या अभिनिवेशावरून असे दिसते की अस्पृश्यता हे फक्त सवर्ण हिंदूंचेच पाप आहे. नेहमी करण्यात येणारी ही गफलत आहे. अस्पृश्य मानले गेलेले लोक हे हिंदूंचेच घटक समजले जातात; पण प्रत्यक्षात या मंडळींनी काय फक्त सवर्ण हिंदूंचाच मैला वाहिला आणि सवर्ण हिंदूंसाठीच रस्ते झाडले ? मुसलमान समाजाने आणि ख्रिश्चन समाजाने या वर्गाकडून मिळणारी सर्व श्रमसेवा तेवढी पिढ्यान्पिढ्या लुबाडली आणि पापांचे वाटेकरी म्हणून फक्त सवर्ण हिंदूंकडे बोट केले ! अस्पृश्यतेच्या पापात मुसलमानांची आणि ख्रिस्त्यांची भागीदारीही शंभर टक्के आहे. ही श्रमसेवा अखंड लाभावी म्हणून पाकिस्तानात श्री. जोगेंद्रनाथ मंडल या हरिजन मंत्र्याला नेमण्यात आले आणि अखेर हिंदू म्हणून या समाजाची पाकिस्तानने काय ससेहोलपट केली, याची कहाणी श्री. मंडल यांनी भारतात आल्यावर सांगितली आहे. ती श्री. चित्रे यांनी मुळातून वाचावी.

अस्पृश्यता ही घटनेने आज गुन्हापात्र केली आहे. सुशिक्षित आणि समंजस लोकांची पावले अस्पृश्यतेविरुद्धच सतत पडत आहेत. हिंदू माणूस जन्माला आल्यानंतर त्याच्या इच्छेनुसार त्याची जात थोडीच ठरते ! जन्माला आल्याबरोबरच त्याची जात इतरेजन नक्की करतात. यावर काही खास उपाय श्री. चित्रे किंवा त्यांची थोर सोसायटी यांच्यापाशी तरी आहे काय ? असा उपाय निघू शकत नाही ही खरी शोकांतिका आहे.

असो.

गंभीरपणे एखाद्या विषयावर लेख लिहिणे हे मला कधी करावेसे वाटत नाही. मात्र शब्दांच्या बुरख्याआड दडलेले पोकळ आणि भंपक पांडित्य सापडले, की मला बुरखे फाडावेसे वाटतात. माझ्या कुवतीप्रमाणे मी हे गमतीने करत असताना, उपहासाला कुचाळकीचे स्वरूप येऊ नये, असा माझा प्रयत्न असतो. वर्षानुवर्षे मी 'माणूस'च्या सदरातून लिहीत असूनही, या साप्ताहिकाला अजून प्रतिष्ठा व दर्जा आहे, असे श्री. चित्रे संपादकांना लिहितात, त्यावरून त्यांना ही गोष्ट पटावी. माझा बुरखे ओढण्याचा प्रयत्न जेव्हा क्वचित फसतो, तेव्हा ही गोष्ट सर्वांच्या आधी मलाच समजते. श्री. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी ती काळजी वाहण्याचे कारण नाही.

माझी पत्रकारी ही धर्मनिष्ठ नाही, पण वर्मनिष्ठ मात्र आहेच आहे. लोक सगळयाच गोष्टी चटकन विसरतात. सर्वसामान्य जनतेच्या स्मरणशक्तीतील या दुर्बलतेचा फायदा राजकीय पुढारी व इतर सांस्कृतिक क्षेत्रांतील ठेकेदारही फार घेतात आणि फसवाफसवी करतात. हे करीत असताना त्यांची जी तारांबळ उडते ती पाहत राहणे, एवढेच माझे या पत्रकारी धंद्यातले भांडवल! हा तसा बिनभांडवली धंदा वर्षानुवर्षे बरा चालतो ही सारी या मंडळींचीच कृपा.

श्री. दिलीप पुरुषोत्तम चित्र्यांना 'हा नाद सोड सोड' हे सांगण्यासाठी हा गंभीर लेखनाचा प्रमाद केला आहे. अन्यथा असे लिहिणे हे आमचे काम नाही, हे आम्ही सुदैवाने ओळखतो.

कळावे. 'इंडियन सेक्युलर सोसायटी' चिरायू होवो, ही इच्छा. कारण अशा सोसायटया वाढल्याखेरीज आम्ही तरी स्तंभात काय लिहिणार?

आपला
**ग्यानबा**

## संपादक 'माणूस' यांस

जुलै, ७

## स. न. वि. वि.

प्रा. अ. भि. शहांच्या गोध्रा येथील मंदिरासंबंधीच्या पत्रावरील 'मुक्ताफळे' 'माणूस'च्या ५–७–६९ च्या अंकात वाचली. नगरपालिकांसारख्या सार्वजनिक संस्थांनी मंदिरासारख्या धार्मिक कार्यासाठी जमीन देणे हे कृत्य 'धर्मातीत राज्या'च्या कल्पनेशी विसंगत असून घटनेच्या ३१ व्या कलमाचा भंग करणारे आहे, असे प्रा. शहा यांचे मत असावे असे वाटते.

आंध्र प्रदेश हायकोर्टाने या प्रश्नाचा निर्णय के. अंकय्या व इतर विरुद्ध आंध्र प्रदेश सरकार या खटल्यात केला आहे. ऑनरेबल जज्ज चिन्नप्पा रेड्डी यांनी निकालपत्रात म्हटले आहे की 'मंदिराच्या भोवतालचे रस्ते मोठे करणे, मंदिराच्या आवारात मुत्र्या वगैरेंची व्यवस्था करणे, मंदिराचा मंडप मोठा करणे ही सार्वजनिक कर्तव्येच (Public purposes) होत व सरकार त्यासाठी खाजगी मालकीची जमीनदेखील योग्य मोबदला देऊन (Compensation) संपादित (Acquire) करू शकते. मंदिराची सुधारणा करण्यात धर्मातीत राज्याच्या (Secular State) कल्पनेशी विसंगत काहीही नसून त्यामुळे घटनेच्या कलम ३१ चा भंग होत नाही.' निकालाची तारीख १८–६–६८ ही आहे.

प्रा. शहा यांचे या निकालाकडे लक्ष वेधून त्यावर त्यांची प्रतिक्रिया ऐकून घ्यायची इच्छा होती.

आपला
**ॲड. दत्ता सावे**

 [ पृष्ठ ७ वरून ]

या देशात शहरांतून आणि खेड्यापाड्यांतून जर एका कुणा महापुरुषाचा पुतळा होणे आवश्यक असेल तर तो कोलंबस याचा होय यात काय संशय? प्रत्येक गावांत कोलंबसाचा पुतळा आणि त्याखाली ही दोन वाक्ये – " भारताचा 'धान्य-पिता' कोलंबस याने अमेरिका शोधून काढली."

कोलंबसाचे पाय अमेरिकेला प्रथम लागले या गोष्टीचे महत्त्व अनेक शतकांनी आम्हांला कळले; कारण अमेरिका कशी आहे हे आम्हांस माहीत नव्हते. परंतु चंद्राचे तसे नाही. उपडे वळण्यापूर्वी, आईच्या मांडीवर पडल्या पडल्याच असंख्य तान्हुल्यांना चंद्राचा शोध लागतो. आम्हांला तो तसाच लागला असावा. 'चंद्र हवा, चंद्र हवा' हा हट्ट फक्त रामालाच करावासा वाटला असे नाही. आम्हांलाही ती इच्छा झाली असावी. अधिकच गोजिरा दिसण्यासाठी हा चांदोबा अधूनमधून निंबोणीच्या झाडामागे लपत असावा, असा संशय काही कालानंतर आला. परंतु भागलेला-थकलेला चांदोबा कधी पाहिल्याचे आठवत नाही!

इंग्लिश कवींनी चांदोबाचा केलेला लिंगबदल ऐकताना मला अंगावर शहाराच आला.

The Lady Moon up yonder
Is like a silver boat
Upon a dark blue ocean,
All silently afloat.

एखाद्या लेडी ॲस्क्विथप्रमाणे, लेडी मून आहे, ही कल्पना सहन होईना. चंद्राचे दिसणारे शेलाटे रूप पाहून, एखाद्या वेळेस रवीने 'चंद्रिका ही जणू' म्हणणे निराळे आणि 'निळ्याशार समुद्राकाशात शांतपणे तरंगणारे रुपेरी गलबत' अशा रितीने या कोरीचे वर्णन करणे निराळे! एखादी स्त्री ही गलबताप्रमाणे दिसते असे म्हणणे चांगले का? परंतु या कवितेच्या पुढच्या ओळी फारच छान होत्या.

And when the fairies waken
They will climb the moonbeams white
And far across the heavens
Go sailing in the night.

रात्र झाली की पऱ्या जाग्या होतील आणि चंद्रकिरणांच्या शिड्या करून चंद्रकोरीवर स्वार होतील. मग रात्रभर आकाशातून दूर दूर त्या तरंगत जातील.

आकाशात रात्रभर हुदडणाऱ्या पऱ्यांचे आपल्याला काय हो! पण चांदणे पसरले–अर्थात ते नेहमी अवनीवरती पसरते त्याप्रमाणे यवनी भवतीही पसरते. चंद्रप्रकाशात तरुण स्त्रीमधली परी जागी होते, असे वि. स. खांडेकरांनी लिहायला हरकत नव्हती. भाऊसाहेब विसरले म्हणून केवळ हे आता आम्हांला लिहावे लागले.

अनुभव मात्र जुनाच आहे. चित्रपटांतून प्रेमिकांच्या चाळचांची वृद्धी चंद्रसाक्ष होण्याची पद्धत जोरात होती. चंदेरी दरिया नाचताना पाहून निवांतपणे पैलतटाला निघालेली प्रेयसी सखयाबरोबर पुन्हा पुन्हा पाहून आमच्या एका मित्रावर विपरीत परिणाम झाला.

त्याने अशीच एक पुनवेची रात्र शोधून काढली. चंद्र कुणालाच दिसत नव्हता; कारण चांदणे चाळीवर पसरले होवे. चाळीतल्या जिन्यात थोडेसे चांदणे ओघळलेले होते. तो तिथेच आपल्या प्रेयसीला म्हणाला–" आपण दोघांनी आयुष्यभर हा चाळीवरचा चंद्र पाहावा असे नाही तुला वाटत ?" ती काहीच बोलली नाही. तो पुन्हा म्हणाला–" जमेल तितके दिवस दोघांनीच पाहू. मग तिघांनी–चौघांनी." तरुण स्त्रीमधील परी जागी झाली...आणि काही दिवसांनी त्यांचे चक्क लग्न झाले ! या प्रकरणात कुणी विरोध केला नाही. मित्राला कुणी या प्रकरणात स्पर्धक असण्याचा संभवच नव्हता. यामुळे खलपुरुषही या कथेत निर्माण झाला नाही.

त्यानंतर या मित्राचे सहकुटुंब चंद्रदर्शन किती वेळा झाले कुणास ठाऊक, पण काही वर्षांनी तो मला म्हणाला–" जानू, प्रेमाची गोष्ट चंद्रसाक्षीने कधी काढू नकोस ! चांदण्यात वस्तूचे आणि माणसांचे आकार फार बदलतात. रीतसर सकाळी मुलगी पाहून लग्न कर !'

यावरून आमची खात्री झाली, चंद्रप्रकाशात तरुण स्त्रीमधली परी जागी होते आणि पुरुष आंधळा होतो. यामुळे तरुण स्त्री दिसायलाही बरी असली तर आंधळ्याचे नशिब !

' यावश्चंद्र पृथ्वीवर अशी नानाप्रकारे धमाल करणाऱ्या या चंद्राचे नेमके रूप काय आहे हे मानवाला आतापावेतो कळलेले नाही. दुरून डोंगरच साजरा दिसतो असे नाही. चंद्राची अवस्था तीच असावी. तिथे काय आहे हे आपल्याला माहीत नसले तरी तिथे काय नाही हे नक्की माहीत आहे. तिथे मानवाची वस्ती नाही याचा अर्थ तिथे प्रासादांच्या वसाहती नाहीत आणि झोपडपट्टीही नाही ! तिथे कुणाचे राज्य अजून नाही याचा अर्थ तिथे अजून ' निवडणुका ' नाहीत ! तिथे अजून हॉस्पिटले नाहीत याचा अर्थ तिथे अजून रोग नाहीत ! तिथे अजून स्त्री नाही याचा अर्थ तिथे अजून ' चंद्रशेखरी उपाय'ही नाहीत ! तिथे रस्ते नाहीत याचा अर्थ तिथे ओसंडणाऱ्या कचरापेट्या नाहीत; आणि रस्त्यावर फतकल मारून बसलेल्या गोमाताही नाहीत ! तिथे अजून हिंसा नाही याअर्थी तिथे अहिंसेची अखंड बडबडही नाही ! चंद्रलोक खरोखरच किती छान आहे. कदाचित ही सुंदरता ही निकोप कुरूपतेसारखी असेल. पण तरीही चंद्रस्थिती आज हेवा करण्यासारखी आहे नाही का ?

नील आर्मस्ट्रॉंग, मायकेल कॉलिन्स आणि एडविन ऑल्ड्रीन हे तिघे अमेरिकन १६ जुलैला पृथ्वीवरून चंद्रावर जाण्यासाठी निघाले आणि २१ जुलैला त्यांनी चंद्र

गाठलाच तर मानवाच्या पत्रिकेत हमखास आढळणाऱ्या चंद्राच्या पत्रिकेतही माणूस दाखल होईल. 'आर्मस्ट्राँग डिस्कव्हर्ड मून' हे चूक अस्ले तरी आर्मस्ट्राँग रिस्कव्हर्ड मून ही गोष्ट अखिल मानवजातीला अभिमानास्पदच आहे. कोटयावधी रुपये खर्चून चंद्रावर जाण्यात अर्थ नाही, अशी या साहसाची वासलात लावणाऱ्यांच्या बुद्धीविषयी काय म्हणावे !

'Man shall not live by bread alone' हे अमेरिकनाने म्हटले यामुळे तीन अमेरिकनच या धाडसाच्या फंदात पडले यात आश्चर्य ते काय ?

आम्हांला संतोष एकच आहे. चंद्रनभीचा मळला खरा पण अमेरिकन तिथे पोचले. गेल्या गेल्या त्यांनी तिथे धान्य लावावे...आणि भारतावर यापुढे फक्त चंद्रकिरणांची बरसात होण्याचे बंद करून, डायरेक्ट धान्याचीच करावी. कोलंबसाप्रमाणे आर्मस्ट्राँगचाही पुतळा इथे होईल. आमच्या पिढ्यांना कोलंबस उपयोगी पडला, तसा पुढल्या पिढ्यांना आर्मस्ट्राँग पडो हीच इच्छा !

## भिकाऱ्यांची शिवशक्ती !

पू. साने गुरुजींची एक आठवण आहे. वसतिगृहात राहत असताना रात्रीचे उरलेले अन्न भिकाऱ्यांना देण्याची चाल होती. रात्री दहाच्या सुमारास एखाद दुसरा भिकारी उष्टया अन्नाच्या आशेने वसतिगृहापाशी येत असे. उरलेले अन्न वाटण्याची कामगिरी एकदा गुरुजींवर आली. अन्न घेऊन गुरुजी वसतिगृहाच्या दाराशी आले व दूरवर असलेल्या भिकाऱ्याला त्यांनी हाक मारली— 'दादा !'

भिकारी या हाकेनेच विरघळला. भिकाऱ्याला नावाने कुणी हाक मारीत नाही. त्याला नाव असेल, त्याच्या कानात त्याच्या आईने हळू आवाजात ते नाव कधी सांगितले असेल, हे कुणाच्याच लक्षात येत नाही. भिकारी आंधळा असतो, लंगडा असतो, पांगळा असतो किंवा नुसताच भुकेला असतो. त्याला दादा, भाऊ अशी हाक कुणी कधीच मारलेली नव्हती.

सानेगुरुजींसारखा आत्मा एखादाच असतो. बाकी सगळे भिकाऱ्यांना ओळखतात ते भिकारी या एकाच सर्वनामाने.

परंतु भिकाऱ्यांना नाव नसले तरी प्रांत असतो, असा शोध नुकताच लागला आहे. साडेतीन कोटींच्या महाराष्ट्रात बत्तीस लाख भिकारी आहेत. आणि त्यांतले २३ लाख हे परप्रांती आहेत अशी माहिती महाराष्ट्राचे समाजकल्याण मंत्री श्री. भारस्कर यांनी नुकतीच दिली. अर्थात ही माहिती ऐकून या २३ लाख उपऱ्यांना हाकलण्यासाठी तुम्ही काय केलेत असा प्रश्न जागृत मराठी जनता विचारणारच ! त्याला उत्तर देताना मंत्री म्हणाले—"त्या त्या राज्याचे भिकारी त्या त्या प्रांतात पाठवण्यासाठी आम्ही निरनिराळ्या राज्यांशी पत्रव्यवहार करीत आहोत !"

हा सुंदर व्यवहार सुरू केल्याबद्दल आम्ही महाराष्ट्र सरकारचे अभिनंदन करतो.

दुःखी माणूस हे कधी विचारीत नाही की मदत देणारा हात हा पाप्याचा आहे की संताचा! परंतु जागृत मराठी जनतेने यापुढे भिकाऱ्याला हे जरूर विचारावे— "तू मराठी भिकारी आहेस की उपरा भिकारी?" आणि मगच वाटल्यास त्याच्यावर दया करावी. यामुळे श्री. भारस्कर यांना 'समाजकल्याण' साधायला खूपच मदत होईल. भिकाऱ्यालाही भीक मिळाली नाही पण एक माणूस आपल्याशी माणसारखा बोलला याचे समाधान होईल.

आम्हांला भीती वाटत होती की मंत्री सांगतील—"इतर देशांच्या दारांत झोळचा घेऊन फिरणाऱ्या भिकाऱ्यांनी भिकाऱ्यांची वर्गवारी करण्यात काय अर्थ आहे? या राज्यातले भिकारी संपले आणि शेजारच्या राज्यात ते वाढले म्हणजे हातावरची खरूज कपाळावर गेली—एवढाच ना त्याचा अर्थ! आज प्रांताचे भिकारी मोजता, उद्या हिंदू भिकारी, मुसलमान भिकारी, बॅकवर्ड भिकारी, फॉरवर्ड भिकारी—अशी संख्या सांगायचा आग्रह धराल! सरकार हे काहीही करणार नाही!"

परंतु श्री. भारस्कर यांनी तर पुढील कारवाई सुरू केल्याचेही सांगितले. लाखांचा पोशिंदा असा हिशेबीच हवा!

भीती एकच आहे, भिकाऱ्यांची अस्मिता जागृत झाली आणि त्यांनी या प्रांतोप्रांतींच्या ससेहोलपटीला कंटाळून भिकाऱ्यांसाठी स्वतंत्र प्रांतच मागितला तर?

## ग्रेट डिफेक्टर!

आमचा संताप संताप झाला आहे! मंत्रिपद मिळाले नाही म्हणून एखादा गोविंद नारायणसिंग काँग्रेस सोडून जातो, पुनः परत येतो, पुनः जायला निघतो; एखादा चरणसिंग काँग्रेसला विसरतो. परंतु राष्ट्राध्यक्षपदासाठी काँग्रेसने निवड केली नाही, म्हणून साक्षात वराहगिरींनी अशी मुसंडी मारावी याचा अर्थ काय? स. का. पाटलांना धक्का बसला, निजलिंगप्पांना धक्का बसला, आम्हांलाही बसला! हा धक्का साधा नाही. हा धरणीकंप आहे. संजीव रेड्डींना मंत्री व्हायचे होते. इंदिराजींनी त्यांना—'व्हायचे तर स्पीकर व्हा, मंत्री करणार नाही, नसेल व्हायचे स्पीकर, तर खाडीलकरांना वर ओढू!' असे खणखणीतपणे बजावल्याची हकीकत आम्ही पूर्वी सांगितलीच होती. रेड्डींनी एक ओळखले होते. अपमान होईल, धक्काबुक्की होईल पण काही झाले तरी दिल्लीतली खुर्ची सोडायची नाही! हा नीलम निखारा धुमसत होता. इंदिराजींनी दुखावलेले अखिल भारतीय नेते मोरारजी, स. का. पाटील, कामराज यांनी संजीव रेड्डींवर झालेला अन्याय या वेळी नीट तपासला. त्यांची खात्री झाली की हा अन्याय आहे. राष्ट्रपती पैगंबरवासी होताच त्यांनी ठरवले की ज्या इंदिरा गांधींनी संजीव रेड्डींना खेटे घालायला लावले, त्याच संजीव रेड्डींकडे इंदिराजींना खेटे घालायला लावण्याची व्यवस्था करण्याची हीच

संधी आहे. झाले ! रेड्डींचे नाव राष्ट्राध्यक्षपदासाठी नक्की झाले नि काय !

अर्थात हे सर्व मतभेद म्हणजे तसे काही मोठे नाहीत. राजकीय पक्ष म्हटला की मतभेद असायचेच; पक्षशिस्त आणि एकजुटीने काम करणे याला महत्त्व आहे ! तेव्हा संजीव रेड्डींची निवड झाली. बाईंना वाईट वाटले. चालायचेच ! Damsel in distress हा खरा म्हणजे मोठा रोमांचकारी प्रसंग. त्याबद्दल वृत्तपत्रांनी एवढा गवगवा करण्याचे मुळीच कारण नाही.

-पण गिरींना हे शोभते का ? हा ' ग्रेटेस्ट शो ऑन अर्थ ' त्यांनी का करावा ? देशातल्या सर्वांत उच्चाधिकारी असलेल्या व्यक्तीने ग्रेट डिक्टेटर होणे यात नवीन काही नाही. परंतु ' ग्रेट डिफेक्टर ' म्हणून इतिहासजमा होण्याचा प्रसंग गिरींनी आपल्यावर ओढवून आणला आहे. भले मोठे पत्रक काढले आहे म्हणे. मी महात्मा गांधींबरोबर काम केले आहे. मजूर चळवळीत आयुष्य गेले आहे. अनुभवाने जेष्ठ आहे. उपराष्ट्रपती हा राष्ट्रपतीच्या खालोखाल. देशातला सर्वांत लायक माणूस असल्यामुळे, मीच या उच्चपदाला लायक आहे अशा हजार बयादी श्री. गिरी यांनी लावलेल्या आहेत. परंतु उपयोग काय याचा ? जेष्ठ, अनुभवी आणि लायक माणसालाच निवडायचे आहे हे श्री. गिरी यांना कुणी सांगितले ? आपले काहीतरीच गृहीत धरायचे म्हणजे काय ? संज्जीव रेड्डी यांना कोर्टाने एका प्रकरणी ठपका दिलेला आहे त्याचे काय, असा क्षुद्र प्रश्नदेखील कुणीतरी वृत्तपत्रात पत्र लिहून विचारला आहे. हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्टांनी कितीतरी थोर थोर काँग्रेस नेत्यांना ठपका दिलेला आहे. चंद्रावर एखादा डाग असला म्हणून काय झाले ? कुणी म्हणतात, यशवंतरावांनी जगजीवनरामना पाठिंबा दिला नाही हे पाहून महाराष्ट्रांत काँग्रेस–रिपब्लिकन युतीला तडे जातील ! सत्तेचे सिमेंट लावले की तडे बुजवता येतात.

काँग्रेस ही एका इंग्लिश माणसाच्या मेंदूचे अपत्य आहे. काँग्रेस स्थापन करताना ॲलन ह्यूम साहेबाने लिहिलेले आहे –

" Let India produce atleast fifty wise men who would renounce personal ease and pleasure. "

भारताने देशासाठी स्वार्थ आणि सुखासीनता सोडलेली फक्त पन्नास माणसे या काँग्रेसला सतत द्यावी अशी ह्यूम साहेबाची अपेक्षा होती. आज पन्नासहून अधिक लोक तर नुसते काँग्रेस हायकमांड म्हणून ओळखले जातात. हे झाले ओल्ड टर्क. शिवाय यंत्र टर्क आहेत, ॲडोलेसन्ट टर्क आहेत, चाइल्डिश टर्क आहेत, इन्फन्ट टर्क आहेत. ह्यूम साहेबाने थडग्यात अस्वस्थ होण्याचे मुळीच कारण नाही.

सिंडिकेट झिंदाबाद ! संजीव रेड्डींचा विजय असो ! ! –

There is a tide in the affairs of men
Which, taken at the flood, leads on to fortune — □ □

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य
ऑगस्ट महिन्याचे राशिभविष्य

**मेष** : या महिन्यात पदार्पण करतानाच अनेक योजना घेऊनच पुढे पाऊल टाकाल. आजवरच्या साऱ्या स्थगित कार्यांना गती मिळावी म्हणून सतत प्रयत्नशील राहाल. औद्योगिक क्षेत्रात सर्वत्र आशादायक वातावरण दिसायला लागेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

आठव्या मंगळाचे आता पितळ उघडे पडलेले असल्यामुळे त्याची दखल घ्यायची गरज भासणार नाही.

दुसऱ्या पंधरवडयात सूर्याचे सिंहराशीत राश्यंतर घडताच, आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल व्हायला लागतील. सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्यासारख्या घटना घडून यायला लागतील.

नोकरीधंद्यात पुढे पाऊल पडेल, सांपत्तिक पेचप्रसंग सुटतील, नव्या जागेचा लाभ घडेल, कदाचित् तुम्हांपैकी कित्येकांना अनपेक्षित धनलाभही घडेल.

यांत्रिक धंद्यातील व्यक्तींना हा एक पर्वकालच वाटेल.

दि. ४ ते १०, १५ ते २०, २४ ते २९ अपेक्षित यश पदरी पडेल.

**वृषभ** : या महिन्याच्या आगमनाबरोबरच आपल्या बऱ्याचशा व्यथाविवंचना संपुष्टात यायला लागतील. पराक्रमांत सूर्य आणि पंचमात गुरू — या दोन विशाल तेजोनिधींचा लाभयोग या एका ग्रहस्थितीनेही तुमच्या व्यवसायक्षेत्रातील तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. ऑगस्टचा मध्यकाल त्या दृष्टीने नोंद करण्यासारखा जाणवेल.

या महिन्यात खूप वेळा दौऱ्यावर जावे लागेल, साहित्यिक–सांस्कृतिक कार्यक्रमात तुमची प्रतिष्ठा खूपच उंचावेल, नव्या योजना आकार घेऊ लागतील, उद्योगधंद्याच्या तंत्रात बदल घडवून आणला जाईल, सांपत्तिक विवंचना कायमच्या मिटून जातील.

दि. १ते ३, ६ ते १०, १६ ते २६, ३० ते ३१ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

**मिथुन :** व्यावसायिक क्षेत्रात, सांसारिक जीवनात अपेक्षित प्रगती–स्वास्थ्य लाभण्यात सिंहाचा वाटा–बुध शुक्राचा आणि या वेळी त्यांची अनुकूलता आपणांस लाभणार असल्यामुळे, हा ऑगस्ट महिना अंगीकृत व्यवसायात आपण चांगलाच गाजवून सोडाल असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये.

दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य सिंहेत पराक्रमस्थानी येताक्षणीच आपली सारी कामे गती घेऊ लागतील, दूरचा प्रवास घडेल, काहींना परदेशी जाण्याचीही संधी लाभेल. नवे स्थावर लाभेल, वादविवाद–मतभेद संपुष्टात यायला लागतील, वैज्ञानिक क्षेत्रात चिरस्मरणीय कार्य ह्यातून घडेल.

दि. ४ ते ७, १५ ते १९, २७ ते ३१ विशेष यश देणारा काल.

**कर्क :** गेल्याच महिन्यात मंगळ मार्गी झालेला असल्यामुळे आपल्या प्रगतीच्या मार्गातील सर्व अडथळे दूर झालेले आहेत. या महिन्यात आपल्या कार्याची गती आणखीन वाढेल.

या महिन्यातील बुध–शुक्र लाभयोग आणि बुध–हर्शल युती यांचा आपल्या व्यवसायधंद्यावर, आचारविचारावर विशेष चांगला परिणाम जाणवू लागेल. नोकरीधंद्यात अनपेक्षितपणे पुढे पाऊल पडेल. सांपत्तिक प्रश्न आश्चर्यकारक रीतीने सुटेल. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. नवा व्यवसायधंदा सुरू करण्यांत यशस्वी व्हाल.

दि. ५ ते ११, १६ ते २०, २६ ते ३० लाभ, यश, प्रतिष्ठा सारे काही लाभावे.

**सिंह :** या महिन्यांत बुध-शुक्रांची सहानुभूती अधिकाअधिक लाभणार असल्यामुळे तुमचे सारे व्यावसायिक प्रश्न अपेक्षेप्रमाणे लवकर सुटू लागतील,

मुख्यतः अखेरच्या आठवड्यातील बुध-हर्शल युतीवर लक्ष केंद्रित करा. त्या काली आपल्या अंगीकृत व्यवसायात फार मोठी क्रांती घडेल, अनपेक्षित स्वरूपाचा लाभ घडणेही शक्य आहे.

चौथ्या मंगळाची डोकेदुखी आता थांबल्यासारखीच आहे. उद्योग-धंद्याचे बदललेले तंत्र यशस्वी ठरेल. अनेक थोरांमोठ्यांच्या मदतीने आपले व्यवसायधंद्याचे स्वरूप अधिक आकर्षक बनेल. दि. १ ते ४, ९ ते १५, १९ ते २७ विशेष लाभाचा काळ.

**कन्या :** या महिन्यातील ग्रहस्थितीच अशी आहे की, आपण काहीही करायचे ठरविले तरी ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. सूर्य एकादशात, बुध-हर्शल युती कन्याराशीत इ. योग तुम्हांला व्यावहारिक यश तर देऊन जातीलच शिवाय तुमचे सामाजिक स्थान खूपच उंचावतील.

तुमच्या साऱ्या आर्थिक समस्या या वेळी सुटाव्यात. अंगावर घेतलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यात आणि मंगलकार्यांची विवंचना पूर्णत्वाने मिटावी. ऑगस्टचा मध्य काल नोंद करण्यासारखा महत्त्वाचा आहे. कला-अभिनय-संगीत-नाट्य या क्षेत्रांशीही आपला घनिष्ठ संबंध यावा. दि. ६ ते १०, १५ ते २१, २६ ते ३१ या काळी आपले प्रयत्न कारगी लागतील.

**तूळ :** अनंत शुभयोग घेऊनच हा महिना आपल्या भेटीस येत आहे. कित्येक महिन्यांत इतका सर्वांगाने अनुकूल काळ आपण अनुभवलेला नसेल. शुक्र भाग्यात, सूर्य-बुध एकादशात यांचा आपल्या व्यवसाय धंद्यावर प्रकर्षाने परिणाम होईल.

चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींना व अन्य कलावंतांनाही या वेळचा भाग्यस्थ शुक्र असे काही घवघवीत देऊन जाईल की, तुम्हांला ते कित्येक दिवस पुरून उरावे.

सभा-संमेलने गाजवाल, नोकरीधंद्यात उच्चस्थान मिळवाल, संशोधन क्षेत्रात प्रतिष्ठा संपादन कराल, अनेकांच्या मदतीने नवे कार्य करण्यास उद्युक्त व्हाल शनीमंगळाचा त्रास आता सहसा जाणवणार नाही. दि. ९ ते १५, २० ते २७' २९ ते ३१ अनेक योजना आकार घेऊन जातील.

**वृश्चिक :** सूर्य आणि त्याच्या पाठोपाठ शुक्रही भाग्यस्थानातून संचारत राहणार असल्यामुळे, ऑगस्ट महिन्यात आपल्या बऱ्याचशा अपेक्षा सफल होतील.

स्थानांतर–स्थित्यंतर घडेल, नव्या व्यवसायाची जबाबदारी स्वीकारली जाईल.

यांत्रिक–वैज्ञानिक-वैद्यकीय क्षेत्रांत तुमचे स्थान निश्चितच उंचावेल. एकादशस्थ गुरूचे सामर्थ्य आताच आपल्या प्रत्ययास यायला लागेल.

राजकीय क्षेत्रातील नव्या जबाबदाऱ्या वाढीस लागतील, व्यवसाय क्षेत्रातील सारे संघर्ष मिटू लागतील.

तुम्हांपैकी कित्येकांना याच महिन्यांत परदेशास जाण्याची संधी लाभेल.

दि. ६ ते १०, १३ ते २०, २७ ते ३१ या काळी आपल्या अनेक योजना गतिमान बनतील.

**धनू :** बाराव्या मंगळाची तीव्रता आता खूपच कमी झालेली आहे. शिवाय सूर्य भाग्यस्थानाकडे यायला निघालेला आहे. ही ग्रहस्थिती तुमच्या मार्गातील अडचणी दूर करायला समर्थ ठरेल.

सांपत्तिक ताण या महिन्यापासून कमी होईल, अनारोग्याची विवंचना दूर होईल, नोकरीधंद्यातील हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील. गेल्या कित्येक महिन्यातील आपल्या बऱ्याचशा असफल आशाआकांक्षा हळूहळू दूर होतील. नोकरीधंद्यासाठी केले जाणारे सर्व प्रयत्न या महिन्यांत यशस्वी ठरतील.

दि. ४ ते ७, १३ ते २०, २६ ते ३० आपल्या बऱ्याच कामांना या वेळी चालना मिळेल.

**मकर :** मंगळ–गुरूचे इतके सहकार्य यापूर्वी आपणांस क्वचितच मिळालेले असेल. यामुळे हा महिना आपणांस अनेक बाबतीत अपेक्षासाफल्याचा जाणवेल.

नोकरी धंद्यासाठी आपण केलेले प्रयत्न या महिन्यात अपेक्षेबाहेर यशस्वी ठरतील. सांपत्तिक लाभ थोडाफार प्रमाणांत तरी निश्चितच व्हावा.

साहित्यिक क्षेत्रातील व्यक्तींना तर हा एक पर्वकाल वाटेल. सभा-संमेलने गाजवली जातील, नवे लेखन हातून घडेल, आरोग्याबद्दलही आता फारशी चिंता करावी लागणार नाही.

प्रवास खूप घडेल, विचार प्रगतिपेर बनतील. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. १ ते ३, ६ ते ११, १६ ते २४, २७ ते ३० आपले सर्व प्रश्न या काळात सुटावेत.

**कुंभ :** गेल्या महिन्यापासूनच तुमची पावले तुमच्या क्षेत्रात पुढे पुढे पडू लागलेली आहेत. या महिन्यात त्यांची गती खूपच वाढेल. अस्वस्थता, उद्विग्नता हे शब्द आता आपण विसरू शकता.

प्रामुख्याने दुसरा पंधरवडा आपल्या प्रत्येक कामात घवघवीत यश देणारा जाणवेल.

राजकीय क्षेत्रात आघाडीवर राहाल, सामाजिक बाबतीत तुमचे स्थान निश्चित उंचावेल. नव्या कल्पना, नवे विचार स्फुरू लागतील, औद्योगिक क्रांतीला प्रारंभ याच महिन्यापासून होईल.

दि. ४ ते ६, ११ ते १६, १९ ते २६ अनेक अपेक्षा सफल होतील.

**मीन :** मंगळाबरोबरच अनेक ग्रहांचे सहकार्य आपणांस लाभत असल्यामुळे आता कोणत्याही बाबतीत मागे रेंगाळण्याचा, माघार घेण्याचा प्रसंगच येणार नाही.

नव्या आशा अंकुरायला लागतील, प्रभावी योजना आकार घेऊ लागतील. आपल्या राहत्या जागेचा आणि पैशाअडक्याचा प्रश्न झटपट सुटेल. नवे कार्य यशस्वी करून दाखवले जाईल, प्रगतीच्या नव्या वाटा याच महिन्यापासून दृष्टि-क्षेपात यायला लागतील.

दि. ६ ते १०, १६ ते २१, २६ ते ३० या काळाची नोंद करा.

□ □



# मुंबई

## दिनांक १५ जुलै

महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यात व गुजराथच्या डांग जिल्ह्यात आदिवासींवर संक्रांत गुदरली आहे. तूर्त त्यांना हुसकावून लावण्याचे सरकारचे काम स्थगित केले गेले आहे हे त्यातल्या त्यात नशीब म्हणायचे ! ह्या भागातल्या जंगलांमध्ये आदिवासींनी आक्रमणे केली, तिथली जंगले तोडली, नांगरण्यायोग्य जमिनीची परिस्थिती निर्माण केली, बांध घातले आणि भाताची पिके काढली – आज नव्हे, काही वर्षांपासून हे चालू आहे आणि आता सरकारला जाग आलेली असून ऐन मोसमांत आलेली पिके उपटून टाकून, आदिवासींना हाकून देऊन 'आक्रमणां'चा निःपात करण्यात्री मोहिम शासनाने उघडली आहे. ठाण्यातल्या काही माहितगारांच्या सांगण्यानुसार, 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेच्या काळात, जंगल अधिकाऱ्यांनीच आजूबाजूला पसरलेल्या आदिवासींना 'त्या भागातून पीक काढा' असे सुचवले. त्यांनी अविश्रांत धडपड करून पिके काढली. शासनाला भाडेपट्टी, सारा भरला. अपेक्षा होती. त्यांनी मशागत केलेल्या जमिनी त्यांनाच देऊन टाकून शासन त्या उपेक्षितांचे अंतरंग बदलायचा प्रयत्न करील ! पण घडले भलतेच. हुकूम सुटले ते नेमके उलटया स्वरूपाचे ! म्हणजे मुंबईतल्या झोपडपट्टचा–चाळींच्या प्रश्नासारखाच हा प्रश्न झाला. चाळी पडत राहिल्या तरी निर्विकारपणे बघत राहयचे, चाळकऱ्यांनी स्वतः प्रश्न धसास लावायचा प्रयत्न केला तर त्यांना कोर्टात खेचायचे ! झोपडपट्टया आधी हव्या तशा वाढू द्यायच्या, स्थिरस्थावर होऊ द्यायच्या, तिथल्या रहिवाश्यांकडून भाडेपट्टी वसूल करायची. आणि एखाद्या सकाळी फटकन् झोपडचा पाडायच्या. वेळोवेळी शासन समस्या सोडवते की बिकट करते, तेच कळत नाही ! आदिवासी, अन्य उपेक्षित ह्यांच्या प्रश्नांकडे गेल्या वीस-बावीस वर्षांत कुणी लक्ष दिलेच नाही. ते स्वतःच काही करू लागले किंवा कंटाळून बंड करून उठले की मात्र त्यांनाच झोडपून काढायचे हा मात्र खासा न्याय आहे !

**–सु. ल. सोमण**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649



" आपल्या नेत्यांचं राष्ट्रीयकरण का करीत नाहीत हे लोक ?
मी म्हणते "